हॉटेल जॉब-सुपरवायझर
१० वी पास/नापास ( वय वर्ष १८ पूर्ण)
१२,०००/- पगार
राहणे/जेवण/फ्री
संपर्क- पाटील ब्रदर्स हॉटेल
पांडवादेवी, पो. पोयनाड
मो.नं. ८६९८७६०००२/८६९८७६०००८
८६९८७६०००५

रायगड, रविवार, दि. ९ जून २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

नारळाची वाडी विकणे आहे
नागाव-अलिबाग, २, ५ एकर नारळाची Fully Developed समुद्रनजीक CRZ च्या बाहेर Clear Title, विहीर, नळ, वीज, खांब, संपूर्ण कायमस्वरुपी कंपाऊंड, सर्व्हे केलेली वाडी विकणे.
Direct Party, एजंट सुद्धा चालेल.
संपर्क - 8828363983

वेधक

## रामोजी राव यांचे निधन

। हैदराबाद । वृत्तसंस्था ।



रामोजी फिल्म सिटीचे संस्थापक रामोजी राव यांचे शनिवारी (दि.८) सकाळी निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. अनेक दिवसांपासून ते आजारी होते. मात्र, त्यांना हृदयाशी संबंधित अनेक समस्या असल्यामुळे त्यांना श्वास घेण्यास त्रास देखील होत होता. त्यांची प्रकृती अधिकच खालावल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होतं. मात्र आज पहाटे ३.४५ वाजता त्यांनी पान २ वर

## तीन अपघातात १ ठार ६ जखमी

**पनवेल** : पनवेल परिसरात तीन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात १ ठार तर ६ जखमी झाल्याची घटना घडली आहे. पनवेल परिसरात झालेल्या पहिल्या अपघातामध्ये शिळफाटा-पनवेल महामार्गावर बीमा कॉम्प्लेक्ससमोर स्टील मार्केट कळंबोली येथे एका अनोळखी इसमाचा अपघात होऊन तो जखमी अवस्थेत पडला होता. याबाबतची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी त्या ठिकाणी जावून सखोल माहिती घेतली. त्याचा पत्ता शोधला असता त्याचे नाव अखिलेश नंदलाल कुमार असे आहे. तो वावंजे येथे राहत असल्याचे समजले. अनोळखी वाहन चालकाने त्याला ठोकर मारून अपघात पान २ वर

## मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक ठप्प; प्रशासनाची तारांबळ

# दरड कोसळली



। महाड । प्रतिनिधी । महाड तालुक्यात शनिवारी ( दि. ८) दुपारपासून वादळी पावसाने सुरुवात केली. या पावसाचा फटका मुंबई-गोवा महामार्गाला बसला आहे. मुसळधार पावसाने मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्गावरील नडगाव गावाजवळील दरड सायंकाळी सव्वा सहानंतर कोसळली. या नैसर्गिक आपत्तीमध्ये जीवितहानी झाली नसली तरी महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. पान २ वर

## तळोजा कारागृहातून बंद्याची ‘धूम’

**पनवेल** : तळोजा कारागृहाच्या सुरक्षेतून बुधवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास २८ वर्षीय बंदी पळून गेल्याची घटना घडली आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस २८ वर्षीय बंदी मुजाहीद गुलजार खान याचा शोध घेत आहेत. परंतु अशा प्रकारच्या हलगर्जीपणामुळे सुरक्षिततेच्या प्रश्नावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुजाहिद याच्यावर शिरुर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाल्यानंतर त्याची रवानगी पान २ वर

## धावत्या ट्रेनमध्ये बाळाचा जन्म

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत येथून जाणाऱ्या महालक्ष्मी एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या गर्भवती महिलेने चक्क रेल्वेतच बाळाला जन्म दिला. कर्जत स्थानकात त्या महिलेला उतरवून पुढील आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

कर्जत रेल्वे स्थानकात पोहोचणाऱ्या महालक्ष्मी एक्सप्रेसने प्रवास करणाऱ्या नऊ महिन्यांच्या गर्भवती महिला फातिमा खातुन यांनी बाळाला जन्म दिला. हातकणंगले रेल्वे स्टेशन येथून त्या पती व तीन मुलांसह महालक्ष्मी एक्स्प्रेस (१७४१२) मधील एस सेव्हन या आरक्षित डब्यातून मुंबईकडे परतीचा प्रवास करत होत्या. या गाडीने लोणावळा रेल्वे स्टेशन सोडल्यानंतर त्यांच्या पोटात दुखायला लागले होते. त्यावेळी त्या गर्भवती महिलेला पान २ वर



## लोढा कंपनीविरोधात शेतकऱ्यांचा लोंढा

। नेरळ । वार्ताहर ।



लोढा कंपनी शेतकऱ्यांच्या शेतातून रस्ता वळविणार असल्याने शेतकरी आक्रमक झाले होते. अखेर कंपनी व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांमधील हा वाद एका बैठकीनंतर जागेच्या सर्वेक्षणावर येवून थांबला. लोढा कंपनीने शेतकऱ्यांना विचारात न घेता वहिवाटीचा पिंपळोली-सुगवे रस्ता शेतकऱ्यांच्या शेतातून वळवण्याचा घाट घातल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्यांनी केला होता. यावर कंपनीने शेतकऱ्यांच्या कुठल्याही जागेतून रस्ता जाणार नाही तर जागेचा सर्वे करण्यात येईल. यानंतरच पुढील कामाला सुरूवात होईल, असे एकमत कंपनी आणि शेतकऱ्यांमध्ये झालेल्या चर्चेत झाले.

कर्जत तालुक्यातील पिंपळोली ग्रामपंचायत हद्दीत लोढा या बांधकाम व्यवसायिकाकडून मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्पाचे काम सुरू आहे. दरम्यान, या कंपनीकडून बांधकाम होत असताना येथील वहिवाटीचा तळवडे पिंपळोलीपुढे सुगावा भीमाशंकर रस्ता हा १०४ राज्य मार्ग असून पिंपळोली ग्रामपंचायत हद्दीत काहीसा रस्ता वळवण्यात येणार असल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्यांनी केला.

हा रस्ता कंपनीने सर्वे नंबर ८२ रंगनाथ भोईर यांच्या सह अन्य पाच जणांच्या मालकीच्या असलेल्या शेतातून वळवला असून त्यासाठी कंपनीने शेतात आखणी करण्यास सुरुवात केली. त्यामुळेच येथील शेतकरी आक्रमक झाले होते. यावेळी शेतकरी प्रवीण भोईर यांनी लोढा कंपनीचा सुरू असलेला मनमानी कारभारामुळे ग्रामस्थांना नाहक त्रास होतो असे सांगत आमच्या शेतातून रस्ता टाकला जात असून कंपनीने साधे आम्हाला विचारलेदेखील नसल्याचा आरोप केला. शेतकऱ्यांनी लोढा कंपनीविरोधात पान २ वर

## आरक्षणासाठी विधानसभा लढविणार

- २८८ उमेदवार उतरवणार रिंगणात
- मनोज जरांगेंचा सरकारला इशारा

। जालना । वृत्तसंस्था ।

मनोज जरांगे पाटील आज ८ जूनपासून पुन्हा एकदा अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी बेमुदत उपोषणाला बसले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे ४ जून रोजीच्या उपोषणाच्या तारखेत बदल करत ८ जून रोजी केली होती. त्यानुसार आजपासून मनोज जरांगे यांनी बेमुदत उपोषण सुरू केले असून राज्य सरकारने सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करावी, अशी आमची मागणी असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले.



जर आमच्या मागण्या पूर्ण केल्या नाही, तर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत संपूर्ण महाराष्ट्रात सर्व जातीधर्माचे २८८ उमेदवार उभे केल्याशिवाय आम्ही राहणार नाही, तसेच विधानसभेला आम्ही नाव घेऊन पाडणार, असा थेट इशारा मनोज जरांगे यांनी दिला. ते अंतवाली सराटी येथे माध्यमांशी बोलत होते. पान २ वर






# ‘शार्लोट’ मधील गाळ काढा

## ■ अन्यथा २१ जूनपासून मनसे करणार उपोषण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**माथेरान या पर्यटन स्थळी असलेले शार्लोट लेक येथील तलाव गाळाने भरला आहे. २०१४ नंतर या तलावातील गाळ काढला नाही आणि त्यामुळे तलावातील गाळ काढण्यात यावा अन्यथ्या २१ जून पासून उपोषण करण्याचा निर्धार माथेरान निसर्ग पर्यटन संस्थेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि माथेरान नगरपरिषद यांना दिलेल्या निवेदनात जाहीर केला आहे.**



माथेरान शार्लोट लेक हा तलाव खोदला आणि पाणी साठवून ठेवण्याचे काम केले. ब्रिटिशांनी बांधलेल्या या शार्लोट लेकची साफसफाई माथेरान नगरपरिषदेकडून मागील काही वर्षे करण्यात आली नाही. पिण्याच्या पाण्याचे दृष्टीने माथेरान शहरातील हा शार्लोट लेक महत्वाचा आहे. दरवर्षी पावसाळा सुरु होण्यापूर्वी माथेरान पालिकेकडून तलावातील कचरा उचलण्याचे काम सफाई काम गार यांच्याकडून करून घेतले जाते. २०१४ मध्ये नानासाहेब धर्मधिकारी प्रतिष्ठान कडून हजारो श्री सदस्य यांच्या माध्यमातून शार्लोट लेकची साफसफाई करण्यात आली होती. त्यानंतर पुढे दहा वर्षांचा कालावधी लोटला आहे.मात्र पालिकेने या तलावाची स्वच्छता केलेली नाही. दोन वर्षांपूर्वी तारीख निश्चित करण्यात आली होती, मात्र नवी मुंबई महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाने आडकाठी केल्यानंतर ऐन पावसाळ्यात शार्लोट लेक मधील गाळ काढण्याचे काम रद्द झाले होते. त्यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून तलावातील गाळ काढण्यची मागणी लावून धरली होती.

आता माथेरान निसर्ग पर्यटन संस्थेने शार्लोट लेकमधील गाळ काढण्यासाठी माथेरान नगरपरिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना अतिम मुदत दिली आहे. २० जूनपर्यंत माथेरानमधील शार्लोट लेक तलाव गाळमुक्त झाला नाही तर मात्र माथेरान नगरपरिषद समोर माथेरान निसर्ग पर्यटन संस्थेचे पदाधिकारी उपोषणाला बसणार आहेत. माथेरान पालिका मुख्याधिकारी आणि जीवन प्राधिकारी उप अभियंता यांना पत्र देण्यात आले. त्यावेळी निसर्ग पर्यटन संस्थेचे अध्यक्ष संतोष कदम, उप अध्यक्ष संजय शिंदे, सचिव अविनाश गोरे, खजिनदार जगदीश कदम आदी उपस्थित होते.

# भारत मुक्ती मोर्चाचे धरणे आंदोलन



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ जवळील ममदापूर येथे असलेले दिलकॅप अभियांत्रिकी महाविद्यालयामधील प्रशासकीय व्यवस्थापनाकडून अनेकांची फसवणूक केली असल्याचा भारत मुक्ती मोर्चा यांचा दावा आहे. त्यासाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष आणि प्राचार्य यांच्याविरुद्ध अट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात यावा, यासाठी भारत मुक्ती मोर्चाकडून धरणे आंदोलन करण्यात आले. दरम्यान,नेरळ पोलीस गुन्हा दाखल करीत नसल्याने पोलीस ठाण्यासमोरील रस्त्यावर उभे राहून भारत मुक्ती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले.

भारत मुक्ती मोर्चा यांच्या राष्ट्रीय अत्याचार निवारण शक्ती यांच्या माध्यमातून आज नेरळ पोलीस ठाण्यासमोर धरणे आंदोलन केले. नेरळ जवळील ममदापूर येथे असलेल्या दिलकॅप अभियांत्रिकी महाविद्यालयात असलेले धनश्री हिवराळे आणि पवन हिवराळे यांना संस्थेचे अध्यक्ष दिलीप कपूर आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य शशांक देवगी यांच्याकडून जातीवाचक वक्तव्ये केली गेली. त्या विरुद्ध या दोघांनी नेरळ पोलीस ठाणे येथे धाव घेऊन दिलकॅप शिक्षण संस्था चालक आणि प्राचार्य यांच्यावर अट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. नेरळ पोलिसांनी अद्याप धनश्री हिवराळे आणि पवन हिवराळे यांच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे भारत मुक्ती मोर्चाकडून गुन्हा दाखल करण्याच्या मागणी साठी धरणे आंदोलन करण्यात आले. त्याचवेळी त्या अभियांत्रिकी संस्थेकडून धनश्री हिवराळे आणि पवन हिवराळे यांच्या जीवाला भीती असल्याने त्यांना पोलीस संरक्षण मिळावे अशी मागणी करण्यासाठी हे आंदोलन केले. एक दिवसीय धरणे आंदोलनाने साऱ्यांचे लक्ष वेधले असल्याचे दिसून आले.

## माणगावात मोफत नेत्रतपासणी शिबीर

**माणगाव** :शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि. १२) पेपर विक्रेते नितीन मेथा सभागृह जुने एसटी स्टँड माणगाव याठिकाणी मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा असे आवाहन उद्योजक विजय मेथा यांनी केले आहे. या शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी येताना सोबत आधार कार्ड व रेशन कार्ड याची झेरॉक्स प्रत आणावी. मधुमेहाची व रक्तदाबाची औषधे सुरु असल्यास ती देखील घेऊन यावीत. रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी जाण्याची, राहण्याची, जेवणाची व परत आणून सोडण्याची मोफत सोय करण्यात आली आहे.

# आवरे येथे गुणवंतांचा सत्कार

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

शिक्षणप्रेमी शिवराम रामा म्हात्रे यांच्या स्मरणार्थ माध्यमिक, उच्च माध्यमिक व स्कॉलरशिप प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष आदर्श शिक्षक अ.ना.पाटील, कार्यक्रमाचे प्रमुख आदर्श शिक्षक ग. ह. ठाकूर यांच्या हस्ते सिद्धिविनायक मंदिर येथे करण्यात आला.

यावेळी निवृत्त केंद्रप्रमुख मनोहर म्हात्रे, प्रभाकर म्हात्रे, गणपत म्हात्रे, महेश म्हात्रे, हरिश्चंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ग. ह. ठाकूर यांनी सांगितले की, आत्मविश्वास व प्रखर मेहनत करून पुढील शिक्षणाची शिखरे प्राप्त करावी तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष



अ. ना. पाटील यांनी सांगितले की, पालकांनी विद्यार्थ्यांवर सक्ती न करता त्याच्या आवडीप्रमाणे त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रवेश द्या.

रामचंद्र म्हात्रे विद्यालयातून पहिला आलेला सिद्धार्थ गावंड, हर्ष म्हामणकर, रियान म्हात्रे, आर्यन म्हात्रे, स्कॉलरशिप मिळवलेला रोनक म्हात्रे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गावातील गुणी कलाकार मरणोत्तर कै. मोरेश्वर गावंड, आवरेरत्न शांताराम गावंड, कवी गायक विनायक गावंड, अष्टपैलू खेळाडू रघुनाथ भोईर व रायगड प्रीमियरमध्ये निवड झालेला जेट फाइटर योगेश पाटील यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन सेवानिवृत्त केंद्रप्रमुख एम. एस. म्हात्रे यांनी तर सूत्रसंचालन आदर्श शिक्षक महेश गावंड यांनी केले. आभार प्रदर्शन विद्याधर गावंड यांनी केले.

# शेलूतील ग्रामतलाव दूषित पाण्याने हिरवागार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

शेलू ग्रामपंचायतीमधील ग्रामतलाव मागील दोन वर्षांपासून हिरव्या तवंगाने व्यापू लागला आहे. शेलू ग्रामपंचायतीकडून तीन वर्षांपूर्वी गाव तलावातील गाळ आणि माती काढून खोली वाढवली होती.त्यानंतर इमारती झाल्या आणि तलावाचे पाणी दूषित झाले असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दरम्यान, गाव तलावातील पाण्यावर हिरवा तवंग दिसू लागल्याने तलावातील पाण्यात आणि त्या तवंगामुळे परिसरातील बोअरवेलचे पाणीदेखील दूषित झाल्याचे ग्रामस्थ बोलू लागले आहेत.

शेलू ग्रामपंचायत हद्दीमध्ये शेलू गावाचे शिवमंदिर असून त्या मंदिराचे मागील बाजूस गाव तलाव आहे. वर्षानुवर्षे त्या गाव तलावात गेली अनेक वर्षे भरपूर पाणी असायचे.



मात्र पावसाळ्यात पावसाच्या पाण्यासोबत वाहून येणारा मातीचा गाळ यामुळे तलावाची पाणी साठवण क्षमता कमी झाली होती. हे लक्षात घेऊन ग्रामपंचायत प्रशासनाने गाव तलावातील पाणी पंपाच्या सहाय्याने बाहेर काढले आणि गाव तलावाची साफसफाई केली. अनेक ट्रक गाळ तलावातून बाहेर काढण्यात आल्यानंतर गाव तलावाची पाणी साठवण क्षमता वाढली. मात्र गाव तलाव स्वच्छ केल्यानंतर एक दोन वर्षे स्थानिक ग्रामस्थांचा आनंद हा काही दिवसांनी तलावाच्या पाण्यावर हिरवा तवंग दिसू लागल्याने मावळून गेला आहे.

आज तलावाच्या चोहोबाजूंनी हिरवा तवंग दिसून येत आहे. त्यामुळे तलावातील पाणी दूषित झाले आहे हे स्पष्ट होत आहे. मात्र शेलू ग्रामपंचायतीचे कार्यालय त्या तलावाच्या अगदी बाजूला आहे. असे असतानादेखील तलावातील पाणी कोणत्या कारणाने दूषित झाले आहे. याची कोणतीही चौकशी ग्रामपंचायतीमधील ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून केली जात नाही. गाव तलावातील पाणी दुषित झाल्याने आणि पाण्यावर हिरवा तवंग दिसू लागल्याने त्या पाण्याखाली असलेले जीव यांना ऑक्सीजनचा पुरवठा होत नसल्याने त्यांची वाढ थांबणार आहे. तलावातील पाणी हिरवेगार होण्याबद्दल आणि पाण्यावर हिरवा तवंग दिसून येत असल्याबद्दल ग्रामपंचायतीकडून कर्जत तहसील कार्यालयालादेखील कोणतीही माहिती पुरवलेली नाही.

शेलू गावातील तरुणांमध्ये उच्च शिक्षित तरुणांचा मोठा भरणा आहे. त्यामुळे गाव तलावातील पाण्यावर हिरवा तवंग कोणत्या कारणाने येऊ शकतो. याचा अभ्यास केल्यास ग्रामपंचायत काही तरी लपवत असल्याचे स्पष्ट होण्याची श्यता आहे. असे गावातील काही जाणकार बोलत होते.

पान १ वरून

## दरड कोसळली

या घटनेची माहिती समजताच आपत्ती विभाग, राष्ट्रीय महामार्ग, महाड नगरपालिका व स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तातडीने महामार्गावर आलेली दरड बाजूला काढण्याचे यशस्वी प्रयत्न या यंत्रणेने केले. दरड कोसळल्याने झालेल्या वाहतूक कोंडीचा मार्ग तातडीने बदलण्यात आला. या मार्गावरील वाहतूक शेजारी असलेल्या मार्गावरून वळविण्यात आल्याची माहिती स्थानिक प्रशासनाकडून देण्यात आली. सुरक्षेचा उपाय म्हणून या मार्गावरील वाहतूक वळविण्यात आली असून या ठिकाणी आवश्यक असलेली यंत्रणा कार्यान्वित राहणार असल्याचे राष्ट्रीय महामार्गाकडून स्पष्ट करण्यात आले. दरम्यान, दोन दिवस महाड शहर व परिसरामध्ये दुपारनंतर झालेल्या म ुसळधार पावसाने मान्सूनपूर्व पावसाची सुरुवात केली आहे. आज दुपारी दोन वाजल्यापासून सुरू झालेला पाऊस सायंकाळपर्यंत सुरू होता.

## तीन अपघातात १ ठार ६ जखमी

केला. यात त्याचा मृत्यू झाला आहे. तर दुसऱ्या घटनेत शहरातील अमरधाम स्मशानभूमी समोरील ठाणा नाकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर रिक्षा, दुचाकी आणि सेलेरिओ कारमध्ये अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील एक आणि रिक्षातील एक असे दोघेजण जखमी झाले. या अपघाताची माहिती पनवेल शहर पोलिसांना देण्यात आली.

अपघात झाल्यानंतर या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. तर तिसऱ्या अपघातात एक ट्रक (एमएच१२क्युजी ३१२३) पुण्याकडून मुंबईकडे येताना रोडच्या डिव्हायडरवर आदळून विरुद्ध दिशेच्या लेनवरून येणाऱ्या किया कार (एमएच ४३ सीजी ६८९८) या गाडीवर आदळून दुसऱ्या बाजूला पलटी झाला. किया कारमध्ये ध्रुवण भोजवानी हे त्यांच्या तीन मित्रासह टी पॉईंटकडून पळस्पे येथे डिझेल भरण्याकरिता जात असताना त्यांच्यावर ट्रक आदळला. त्यामध्ये ध्रुवण हे गंभीररित्या गाडीमध्ये अडकले होते व इतर तीन मित्र जखमी अवस्थेत बाहेर निघाले होते. घटनास्थळी पनवेल शहर ट्रॅफिक पोलीस स्टेशनचे पोलीस जी.एम. मुजावर, पनवेल शहर पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक आर.बी. पाटील हे हजर होते . किया कारमध्ये अडकलेल्या ध्रुवन भोजवानी (वय २६) यांना सिडको अग्निशमन केंद्र नवीन पनवेल येथून फायर इंजिनवर रेस्क्यू व्हॅनसह ड्रायव्हर एस.बी. निकम, लीडिंग फायरमन के.ए. राठोड , फायरमन एस. एम. पड्याळ, बी.एस. पाटील, जे. के. पाटील, जी.पी. गडगे, के. एम. कोळी यांनी रेस्क्यू टूलचा वापर करून गाडीमधून सुखरूप बाहेर काढून हॉस्पिटलला रवाना केले.

## लोढा कंपनीविरोधात शेतकऱ्यांचा लोंढा

तहसीलदार यांना अर्ज केला असून नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. याबाबत नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी देखील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करीत शेतकऱ्यांना दिलासा दिला. दरम्यान तडवडे पिंपळोली सुगवे जाणारा वहिवाटीचा रस्ता कंपनीने वळवण्याचा घाट घातल्याने येथील स्थानिक नागरिक देखील आक्रमक झाले असून यावर काही ग्रामस्थांच्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया समोर आल्या. यामध्ये दीपक कालन या ग्रामस्थानेदेखील कंपनीवर गंभीर आरोप केले आहेत. कंपनी शेतकऱ्यांना विश्वासात घेत नाही. जे पाहिजे ते एका रात्रीत रस्ता बनवत आहेत. यावेळी दिलीप शेळके या ग्रामस्थाने देखील कंपनीविरोधात आपले मत व्यक्त केले आहे. वहिवाटीचा सुरू असलेला रस्ता आम्हाला पाहिजे असून यामध्ये कुठलाही बदल करून दिला जाणार नाही , असा सूर ग्रामस्थांनी आळविला होता. शेतकऱ्यांच्या आक्रमक भूमिकेकडे पाहत लोढा कंपनीचे सुभाष लोणारे व काही अधिकारी यांनी शेतकऱ्यांसोबत संवाद साधला.

दरम्यान यावेळी लोढा कंपनीकडून असे सांगण्यात आले आहे की, कुठल्याही शेतकऱ्यांच्या जागेतून हा रस्ता जात नसून शेतकऱ्यांचे यात कुठलेही नुकसान होणार नाही, याची खबरदारी कंपनीने घेतलेली आहे. जो डांबरी रस्ता आहे तो आमच्या जागेत असल्याने यासाठी वरिष्ठ स्तरावर कागदोपत्री व्यवहार करण्यात आला. जे काम सुरू आहे. ते नियमात होणार असून शेतकऱ्यांनादेखील असे वाटत असेल की जागेचा सर्वे करण्यात यावा. त्यासाठी आम्ही तयार असून शेतकऱ्यांनी त्यांच्यानुसार जागेची मोजणी करावी. यासाठी काही मदत लागल्यास ती आम्ही करू, असेही कंपनीकडून सांगण्यात आले. जे काम सुरू आहे ते शेतकऱ्यांच्या समस्या निवारण झाल्यावर पुन्हा एकदा सुरुवात करण्यात येईल, यावर कंपनी आणि शेतकऱ्यांमध्ये एकमत झाले. एकूणच शेतकरी आणि लोढा कंपनीत झालेल्या सकारात्मक चर्चेत वाद मिटण्याची शक्यता निर्माण झालेली दिसत आहे.

## धावत्या ट्रेनमध्ये बाळाचा जन्म

असंख्य वेदना होत होत्या. महिलेच्या पतीने रेल्वे कंट्रोल रुम यांच्याशी संपर्क साधून मदतीची मागणी केली. गाडी कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोनवर उभी राहिली. त्यानंतर कर्जत येथे स्थानकात उपस्थित असलेल्या आरोग्य पथक तसेच उपजिल्हा रुग्णालयातील परिचारिका शिवानी साळुंखे यांनी महालक्ष्मी एक्स्प्रेस स्थानकात पोहोचताच बाळ व बाळंतीण महिला यांची आरोग्य तपासणी केली.त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल करण्यात आले.

त्यानंतर कर्जत स्थानकातील पोलीस यांच्या मदतीने बाळंतपण झालेल्या माता आणि बाळ यांना कर्जत उपजिल्हा रुग्णालय येथे नेले. तेथे डॉ. जयश्री म्हात्रे यांनी बाळंतीण महिलेची तपासणी करुन त्यांना पुढील उपचारासाठी दाखल केले. संबंधित माता आणि बाळाला कर्जत रेल्वे स्थानकातील पोलीस कर्मचारी संतोष डांगले, गौतम जाधव, मोहिनी जाधव, माधुरी खंडागळे, बिन्नर, पवार,सुरक्षा रक्षक राजश्री, कर्जत रेल्वे स्टेशन मास्तर हेमंत शर्मा यांनी स्थानकातून बाहेर नेण्यासाठी मदत केली. कर्जत उपजिल्हा रुग्णालयाच्या परिचारिका शिवानी साळुंखे, डॉ. जयश्री म्हात्रे, आरोग्य सेविका प्रमुख सविता पाटील तसेच रुग्णवाहिका सेवक निलेश परदेशी यांचे बाळंतीण महिला फातिमा खातुन कुटुंबाने आभार मानले आहेत.

## तळोजा कारागृहातून बंद्याची ‘धूम’

तळोजा मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली होती. गुरुवारी रात्री याबाबत तळोजा मध्यवर्ती कारागृहातील कर्मचारी एकनाथ पाटील यांनी खारघर पोलिसांना दिलेल्या तक्रारीमध्ये मोलमजुरी करणारा मुजाहिद हा शिरुर पोलीस ठाण्यातील एका गुन्ह्यात न्यायालयाने त्याची रवानगी तळोजा कारागृहात केली होती. बुधवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास कारागृहातील पोलिसांच्या ताब्यात असताना कारागृहासमोरील रस्त्यावरुन तो पळून गेल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याबाबत कारागृह प्रशासन अधिक चौकशी करीत आहे. परंतु, अशा घटना वेगवेगळ्या कारागृहात वारंवार घडत असल्याने सुरक्षिततेच्या प्रश्नावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## आरक्षणासाठी विधानसभा लढविणार

संपूर्ण मराठा समाजाला माझे आवाहन आहे की, आपण शांततेत राहायचं. आमच्या आंदोलनाविरोधात काही निवेदने जाणीवपूर्वक देण्यात आले आहेत. मात्र, भविष्यात आम्हीही असे निवेदन देऊ. तुमच्या काही रॅली निघतील. मग त्यावेळी आम्हीही अशा प्रकारचे निवेदन द्यायची का? महाराष्ट्रात रॅली तुम्ही काढणार असाल तर आम्हालाही रहदारीला त्रास होणार आहे. मग तुम्ही तुमची रॅली रद्द करणार आहात का?,असा सवाल मनोज जरांगे यांनी केला.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमची मागणी असलेल्या सगेसोयरे या अध्यादेशाची अंमलबजावणी तातडीने करावी एवढीच आमची मागणी आहे. या मागणीसाठीच आजपासून पुन्हा एकदा उपोषणाला बसत आहे. तर सरकारला हा कायदा करण्यासाठी काही पुराव्याची गरज लागत असेर तर तब्बल ५७ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत, असे मनोज जरांगे म्हणाले.

गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं होतं की, राज्यातील मराठा आंदोलनादरम्यान जे गुन्हे दाखल करण्यात आले ते गुन्हे मागे घेऊ. मात्र, एकही गुन्हा मागे घेण्यात आलेला नाही. यामध्ये अनेक विषय आहेत. आमच्या मागण्या सरकारने मान्य कराव्यात अशीच आमची मागणी आहे. सरकाच्यावतीने निवेदनं देण्यात आली. मात्र, मी आचारसंहितेचा सन्मान केला. ४ जून रोजीचं उपोषण ८ जून रोजी केलं. आमच्या आंदोलनाच्या विरोधात निवेदन देणारे कोण आहेत? हे सर्वांना माहिती आहेत. मोदींच्या शपथविधीमुळे जनतेला त्रास होणार असेल तर मग शपथविधीचा कार्यक्रम होणार नाही का?, असा सवालही मनोज जरांगे यांनी केला.

आम्ही आंदोलन स्थगित केलं होतं. त्यामुळे पुन्हा परवानगीची आवश्यकता नाही. यावेळी कडक उपोषण करण्यात येणार आहे. आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांना आवाहन करत आहोत की, त्यांनी पुढे येऊन हा विषय मार्गी लावावा. मात्र, ते लक्ष देत नाहीत. आमचं ध्येय मराठा आरक्षण मिळवणं हेच आहे. जर आरक्षण दिलं नाही तर महाराष्ट्रात सर्व जातीधर्मांचे २८८ उमेदवार आम्ही उभे केल्याशिवाय राहणार नाही. मग ती तुमची जबाबदारी असेल. भारतीय जनता पक्षातील जेवढे आमदार आहेत, त्यांनी त्यांच्या पक्षाच्या नेत्यांना सांगावे. अन्यथा विधानसभेला नावे घेऊन पाडणार, असा थेट इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

## रामोजी राव यांचे निधन

अखेरचा श्वास घेतला.रामोजी राव यांच्यावर हैदराबाद येथील स्टार रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, त्यांची प्रकृती अधिकच खालावल्याने त्यांना ५ जून रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आले. हृदयाशी संबंधित अनेक समस्या असल्यामुळे त्यांना श्वास घेण्यास त्रास देखील होत होता. रामोजी राव यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९३६ साली आंध्र प्रदेशच्या कृष्णा जिल्ह्यात मध्यवर्गीय कुटुंबात झाला. आशिया खंडातील सर्वात मोठी फिल्म सिटी असलेली रामोजी फिल्म सिटीची स्थापना त्यांनी केली. तब्बल २ हजार एकरात १९९६ साली ही रामोजी फिल्स सिटी सुरु करण्यात आली. बाहुबली हा भारतातील पहिला बिग बजेट सिनेमा याच रामोजी फिल्म सिटीत बनवला गेला.

# महावितरणचा वर्धापनदिन उत्साहात

**। रायगड । वार्ताहर।**

महावितरणच्या कल्याण परिमंडलात महावितरणचा १९ वा वर्धापन दिन गुरुवारी (दि. ०६ जून) सायंकाळी उत्साहात साजरा झाला. कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता धनंजय औंढेकर यांची या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती. नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचारी, अभियंते, अधिकारी व त्यांच्या कुटुंबियांनी या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

महावितरणच्या १९ व्या वर्धापन दिनानिमित्त कोकण प्रादेशिक विभाग, कल्याण परिमंडल, कल्याण एक आणि दोन तसेच कल्याण स्थापत्य मंडलांतर्गत कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी डोंबिवलीतील सावित्रीबाई फुले नाट्य मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महापुरुषांच्या संयुक्त जयंती



### कर्मचाऱ्यांसह कुटुंबियही सहभागी

महोत्सवाची परंपरा सलग तिसऱ्या वर्षी कायम ठेवताना लेखक जगदिश ओहोळ यांचे प्रभावी व्याख्यान कार्यक्रमाच्या सुरुवातीला झाले. तर त्यानंतर यदा कदाचित रिटर्न्स या व्यावसायिक नाटकाच्या सादरीकरणाने उपस्थितांचे निखळ मनोरंजन करताना त्यांना अंतर्मुख होण्यास भाग पाडले.

या कार्यक्रमाला अधीक्षक अभियंते अनिल घोगरे, निलकमल चौधरी, संदिप पाटील, विजय मोरे, दीपक पाटील, दिलीप भोळे, संजय खंडारे, दिलीप खानंदे, महेश अंचिनमाने, महाव्यवस्थापक अनिल बऱ्हाटे, उप महाव्यवस्थापक योगेश खैरनार, हविषा जगताप, उपसंचालक सुमीत कुमार, सहायक महाव्यवस्थापक धैर्यशील गायकवाड, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, कार्यकारी अभियंते, उपविभागीय व शाखा अभियंते, नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रमदानातून तुपगाव तलावाची स्वच्छता

**। रसायनी । वार्ताहर ।**

तुपगाव ग्रामपंचायत हद्दीतील तलावावर महिलावर्ग कपडे धुण्यासाठी येतात तर मुकी जनावरे पाणी पिण्यासाठी याच तलावावर येत असतात. हा तलाव दाट हिरवळ जलपर्णीने भरल्याने जणू खेळाचे मैदान तयार झाल्याचे चित्र तयार झाले होते. यामुळे तलावाचे पाणी वापरण्यास समस्या निर्माण झाल्याने ग्रामस्थांनी सरपंच रविंद्र कुंभार यांना सांगितले. यावेळी तत्काळ सरपंच कुंभार यांनी गावातील तरुणांना सदर परिस्थिती लक्षात आणून देत तरुणांच्या सहकार्यातून श्रमदान करुन तलावाची



स्वच्छता करण्याचे ठरले. तुपगावचे सरपंच रविंद्र कुंभार व तरुणांनी श्रमदान करुन तुपगाव तलावाची स्वच्छता केली.

# निबंध स्पर्धेत अपूर्वा जंगम यांचे यश

**। माणगाव । वार्ताहर ।**

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण यांच्या शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय निबंध व जाहिरात चित्रीकरण स्पर्धेत माणगावच्या उपक्रमशील शिक्षिका व उत्कृष्ट सूत्रसंचालिका अपूर्वा अमोल जंगम यांनी यश संपादित केले असून त्यांच्यावर माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर सेवाभावी संस्था माणगाव यांनी विशेष अभिनंदन केले आहे.



पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण यांनी शताब्दी महोत्सवानिमित्त जिल्हास्तरीय निबंध व जाहिरात चित्रीकरण स्पर्धेचे आयोजन केले होते. अपूर्वा जंगम यांना पतपेढीच्या माणगाव शाखेत गुरूवारी (दि.६) आकर्षक सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व धनादेश बक्षिसे देऊन पेण प्राथमिक शिक्षक पतपेढी पेणचे चेअरमन रवींद्र पाटील, व्हा.चेअरमन अरविंद मोरे, अलिबाग प्राथमिक शिक्षक पतपेढीचे चेअरमन नरेश सावंत, अखिल माणगाव तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष दत्ताराम शिर्के यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

# कृषीवल जाज्वल्य विचारांचे व्यासपीठ

## सिनेतारका सई ताम्हणकर यांचे गौरवोद्गार





### कार्यक्रमाची उंची वाढली- चित्रलेखा पाटील

कृषीवल वर्धापन दिनानिमित्त महिलांसाठी फॅशन शो स्पर्धेचे आयोजन करणे हा एक चांगला उपक्रम या निमित्ताने राबविला आहे. चुल व मुल या पलिकडेही महिलांचे जग आहे. हे यातून दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. महिला आज सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत. फॅशन शोच्या जगतामध्येही महिला कमी नाहीत. विशेष करून अलिबागसह संपुर्ण जिल्ह्यातील महिला व मुलीदेखील या क्षेत्रात प्रगती करीत असल्याचा आनंद आहे. कृषीवलच्या टीमने चांगला कार्यक्रम राबविला आहे. सई ताम्हणकर सारख्या सिने कलाकार उपस्थित राहिल्याने या कार्यक्रमाची उंची अधिकच वाढली आहे.

● (सर्व छायाचित्र : समीर मालोदे)

### कृषीवलमध्ये रायगडचे प्रतिबिंब - प्रसाद केरकर

आजचा कार्यक्रम खुपच छान झाला आहे. रायगड जिल्हा हा मुंबईच्या जवळ असला तरीही ग्रामीण भागाचा वर्चस्व असलेला जिल्हा आहे. कृषीवल वर्धापन दिनानिमित्त महिलांसाठी फॅशन शो घेणे खुपच कठीण काम होते. महिलांच्या कलागुणांना वाव देण्याची संधी या कार्यक्रमातून उपलब्ध करून दिली. कार्यक्रमाला प्रतिसादही अपेक्षेपेक्षा अधिक मिळाला. कृषीवलचे ८८ वे वर्ष असून पुढे आणखी जोमाने वाटचाल करण्याचा प्रयत्न राहणार आहे. बदलत्या काळानुसार वाचकांच्या पसंतीनुसार कृषीवलने काम केले आहे. कृषीवलची डिजीटल आवृत्तीदेखील आहे. जगभरात डिजीटलच्या रुपाने कृषीवल आज घराघरात पोहचले आहे. रायगडचे योग्य प्रतिबिंब पोहचविण्याचा प्रयत्न कृषीवल करीत आला आहे, त्याचा आनंद आहे, असे प्रतिपादन कृषीवलचे सल्लागार संपादक प्रसाद केरकर यांनी केले.

### कृषीवलने कायमच महिलांचा सन्मान केला- माधवी सावंत

कृषीवलने आजपर्यंत महिलांचा सन्मान केला आहे. कृषीवलच्या व्यवस्थापकीय संचालिका चित्रालेखा पाटील यांनी महिलांना प्रत्येक क्षेत्रात पुढे नेण्याचे काम केले आहे. राजकिय, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुढे गेल्या पाहिजेत ही, त्यांची भावना राहिली आहे. कृषीवलच्या माध्यमातून त्यांनी महिलांसाठी व्यासपीठ मिळवून दिले आहे. त्यांच्यासारखे नेतृत्व अलिबागकरांसह रायगडकरांना मिळाले आहे. ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. कृषीवलची घोडदौड गेली ८८ वर्षे सुरु आहे. ही दौड अखंडित चालेल, अशा विश्वास आहे. वर्धापन दिनानिमित्त एक चांगला कार्यक्रम राबविला आहे. त्याचे खरे श्रेय संपूर्ण कृषीवल टीमला जाते. सर्वांनी घेतलेल्या प्रचंड मेहनतीमुळे फॅशन शो यशस्वी झाला, असे प्रतिपादन कृषीवलच्या कार्यकारी संपादक माधवी सावंत यांनी केले.

**मिस कृषीवल २०२४ ची मानकरी ठरली हिमानी गायकर**

- फर्स्ट रनरअप - दक्षता देसाई
- सेकंड रनर अप- श्रुती शिरसाठ
- बेस्ट वॉक - रिध्दी सुर्वे
- बेस्ट पर्सनॅलिटी - आदिती पाटील
- बेस्ट कॉस्च्यूम - कांचन मोहिरे
- ब्युटी विथ ब्रेन - आदीती म्हात्रे
- बेस्ट स्माईल - स्मितल म्हात्रे
- फोटोजेनिक फेस - तलिशा चौगूले

**मिसेस कृषीवलची मानकरी ठरली हर्षदा धिवरे**

- फर्स्ट रनरअप - प्रियांका राऊत
- सेकंड रनर अप - प्रिती पाटील
- बेस्ट वॉक - जागृती भगत,
- बेस्ट पर्सनॅलिटी - ननिता भोसले
- बेस्ट कॉस्च्यूम - प्रतिक्षा मुळीक
- ब्युटी विथ ब्रेन -प्रार्थना नागावकर
- बेस्ट स्माईल - जितेश्री चौगुले
- फोटोजेनिक फेस - सेजल हाडकर

### मीनाक्षी पाटील यांना श्रध्दांजली

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री स्वर्गीय मीनाक्षी पाटील यांचे कृषीवलच्या वाटचालीत मोठे योगदान राहिले आहे. रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी भुमिका बजावली आहे. कृषीवलच्या वर्धापन सोहळ्यानिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देत मीनाक्षी पाटील यांना कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा, सांस्कृतिक, पत्रकारीता, उद्योग, वैद्यकीय अशा अनेक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.




। प्रमोद जाधव ।
। अलिबाग ।

जनतेचे प्रश्न मांडण्याबरोबरच ते सोडविण्याची धमक फक्त कृषीवल वृत्तपत्रामध्ये आहे. त्यामुळेच कृषीवल हे जाज्वल्य विचारांचे व्यासपीठ आहे, असे प्रतिपादन सिनेतारका सई ताम्हणकर यांनी केले. कृषीवलच्या ८८ व्या वर्धापन दिनानिमित्त कुरुळ येथील क्षात्रैक्य समाज हॉलमध्ये मिस कृषीवल व मिसेस कृषीवल २०१४ या फॅशन शोचे शुक्रवारी (दि.७) सायंकाळी आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवले जातात. हळदी-कुंकू समारंभ हा तर कृषीवलचा ब्रॅण्ड झाला आहे. वेळेबरोबरच काळानुसार बदलणे खुप महत्वाचे आहे. ग्रामीण व शहरी भागातील महिलांना एकत्र आणून विचारांची देवाण-घेवाण करण्याची संधी त्यांना यातून दिली जाते. हा खुप प्रगतशील उपक्रम आहे. अशा उपक्रमासोबत चित्रलेखा पाटील व सुप्रिया पाटील या कायमच महिलांच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहत आहेत आणि म्हणूनच अशा उपक्रमांना अधिक चांगली गती आणि सकारात्मक दृष्टीकोन मिळतो, असे सई ताम्हणकर यांनी सांगितले.

यावेळी कृषीवलच्या सल्लागार संचालक सुप्रिया पाटील, व्यवस्थापकीय संचालक चित्रलेखा पाटील, अलिबागच्या माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप नाईक, माजी नगरसेवक वृषाली ठोसर, रजनी घरत, शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख प्रिती पाटील, आक्षीच्या सरपंच रश्मी पाटील, शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते जगन्नाथ म्हात्रे, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, सदस्य निखील मयेकर, कृषीवलचे सल्लागार संपादक प्रसाद केरकर, कार्यकारी संपादक माधवी सावंत, कृषीवलचे वरिष्ठ सहाय्यक संपादक आविष्कार देसाई, सहाय्यक संपादक सुयोग आंग्रे, वरिष्ठ उपसंपादक राकेश लोहार, प्रमोद जाधव, व्यवस्थापक रुपेश पाटील, जाहीरात व्यवस्थापक हर्षा पाटील, सचिन गुप्ता, दर्शना पाटील, भैरवी जाधव, समृध्दी म्हात्रे, अंकित भानुशाली, डिजीटल उपसंपादक संतोष राऊळ, कला संपादन केदार गुरव, मानसी गोतावडे, कल्याणी भगत, शुभांगी गुळेकर, अंतरा पारंगे, योगिता वडके, सानिका म्हात्रे आदींसह संपादकीय, जाहीरात, वितरण व बायडींग विभागाचे कर्मचारी तसेच परिक्षक किरण साष्टे, लक्ष्मी मुकादम, ज्योती बावधनकर-राऊळ, मेकअप आर्टीस्ट अमित वैद्य, अंकिता राऊत, जगदीश झोरे, कोरीओग्राफर जयेश पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुयोग आंग्रे तर संपुर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रतिम सुतार यांनी केले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना सई ताम्हणकर म्हणाल्या की, शेतकरी, कामगार, कष्टकरी, गोरगरीबांच्या हक्कासाठी सुरु झालेल्या दैनिक कृषीवलसारख्या वृत्तपत्राने ८८ वर्षाची परंपरा जपली आहे. ही एक अभिमानाची गोष्ट आहे. ही परंपरा पुढे नेण्यासाठी एखादी स्त्री पुढे येते. त्यावेळी ही गोष्ट अधिक भव्यदिव्य होते. त्याचे उदाहरण म्हणजे चित्रलेखा पाटील आणि सुप्रिया पाटील होय. कृषीवल नावाचे वृत्तपत्र जनसामान्यांच्या हक्काचे एक व्यासपिठ आहे. या वृत्तपत्राच्या माध्यमातून तुमचे प्रश्न मांडण्याची संधी मिळाली आहे. प्रत्येकाला असे व्यासपिठ मिळत नाही. मात्र अलिबागसारख्या ठिकाणी जाज्वल्य विचारांचे कृषीवलसारखे व्यासपीठ मिळाले आहे. त्याचे एक समाधान आहे. जनतेचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करताना, सामाजिक उपक्रम राबविले जातात. अशा वृत्तपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त मला येण्याची संधी मिळाली, त्याचा मला फार आनंद होत आहे. कृषीवलच्या वर्धापन दिनानिमित्त फॅशन शोचे आयोजन केले आहे. या शोमध्ये ग्रामीण भागाचे महत्व पटवून देण्याचे काम केले आहे. ही सर्वांसाठी एक अभिमानाची गोष्ट आहे, असे सांगत सिनेतारका सई ताम्हणकर यांनी कृषीवलच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

---

# शिवराज्याभिषेक सोहळ्याचा जल्लोष

**कृषीवल माध्यम प्रायोजक**





**विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा अलिबाग शहरात रंगला होता. कृषीवल या कार्यक्रमाचे माध्यम प्रायोजक होते. याप्रसंगी धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासून रात्रीपर्यंत राबविलेल्या विविध उपक्रमांचा आनंद अलिबागकारांनी मनमुदारपणे लुटला.

यावेळी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल, माजी नगरसेवक संजना किर, अनिल चोपडा आदी मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज चौक उत्सव समिती अलिबागच्यावतीने श्री शिवराजाभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. अलिबागमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे हा सोहळा पार पडला. शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुर्णाकृती पुतळ्याजवळ सकाळी ध्वज पुजन करण्यात आले. सायंकाळी कुलाबा ढोल-ताशा ध्वज पथकामार्फत महाराजांना मानवंदना देण्यात आली. ढोल पथकाच्या आवाजाने संपुर्ण शहर दुमदूमन गेले. एक वेगळा उत्साह, आनंद यातून दिसून आला. यावेळी मंगलमुर्ती वाद्य पथकाद्वारे मानवंदना देण्यात आली. जय हनुमान लाठी-काठी आखाडा भोनंग व अलिबाग मार्शल आर्टस् अकादमी लाठी-काठी व मर्दानी खेळाचे सादरीकरण करण्यात आले. स्ट्रींग फॅमिली प्रस्तुत सूर मराठी मातीचा उत्सव शिवस्वराज्याचा, हा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. छत्रपती शिवाजी महाराजांची माहिती कार्यक्रमाच्या माध्यमातून देण्यात आली. पोवाडे, गीतांचा आनंद प्रेक्षकांनी दाद दिली. फटाक्यांची आतषबाजी करुन कार्यक्रमांची सांगता करण्यात आली.

---

# बळीराजाचे डोळे लागले आकाशाकडे

। अलिबाग । प्रतिनिधी ।



मशागतीची कामे संपली असून शेतकऱ्यांनी पेरणीच्या कामाला सुरुवातदेखील केली आहे. मात्र, जूनचा पहीला आठवडा संपत आला, तरी पाऊस काही बरसला नाही. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पावसाची प्रतिक्षा असून पाऊस कधी पडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये ९८ हजारहून अधिक हेक्टर क्षेत्रामध्ये भात लागवड केली जाते. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी बांधबंदिस्ती व इतर शेतीची कामे पुर्ण केली आहेत. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून काही शेतकऱ्यांनी वाफे पेरणीला सुरुवात केली आहे. जिल्हयात अनेक भागांमध्ये भात पेरणीची लगबग सुरु असून लागणारे बियाणे खरेदीसाठीदेखील दुकानांमध्ये गर्दी होऊ लागली आहे. मात्र, जून महिन्याचा पहिला आठवडा संपत आला, तरीदेखील पावसाने अजूनपर्यंत हजेरी लावली नाही. कडक उन्हामुळे पेरणी केलेले बियाणे वाया जाण्याची भिती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागून राहिले आहेत.

गेल्या आठ दिवसांपासून हवामान खात्याकडून पाऊस पडण्याच्या इशारा दिला जात आहे. काही ठिकाणी रिमझीम तर काही ठिकाणी जोरदार पाऊस बसणार असल्याचे सांगण्यात आले आहे. परंतु, अद्यापर्यंत पावसाने हजेरी लावली नाही. आठ तारखेनंतर पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. पाऊस लवकरात लवकर पडावा अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# विवेक पाटीलचे अपघाती निधन

। अलिबाग । प्रतिनिधी ।



तालुक्यातील कुरुळ येथील विवेक पाटील (२७ वर्षे) या तरुणाचे शुक्रवारी रात्री अपघाती निधन झाले. त्याच्या निधनाने कुरुळ गावात शोककळा पसरली आहे. विवेक पाटील हा तरुण नेहुली येथे कामानिमित्त गेला होता. रात्री आठनंतर तो नेहूली येथून कुरुळकडे येत होता. दरम्यान पेण-अलिबाग मार्गावरील राऊतवाडी येथे समोरून एक कार आली. कार आणि दुचाकीचा समोरासमोर अपघात झाला. या अपघातामध्ये विवेक पाटील या तरुणाला गंभीर दुखापत झाली. त्याला अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासून त्याचा आधीच मृत झाल्याचे घोषित केले. विवेक पाटीलच्या पार्थिवावर शनिवारी सकाळी कुरुळ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अलिबाग अर्बन बँकेचे संचालक अवधुत पाटील, ॲड. मनोज ओव्हाळ, योगेश घाडगे, सचिन पाटील, समीर पाटील, अनिल पाटील, कुरूळ येथील ग्रामस्थ, तरुण मंडळींनी उपस्थित होते.

# वाहतूक पोलिसांचा दणका

। अलिबाग । प्रतिनिधी । वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहन चालकांना रायगड पोलिसांनी दणका दिला. गुरुवारी दिवसभरात केलेल्या कारवाईत ५६ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. जिल्हा वाहतूक शाखेमार्फत बेशिस्त वाहन चालकांवर नेहमी कारवाई केली जाते. जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक अनिल लाड यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. हेल्मेट नसणे, वाहन वेगात चालविणे अशा विविध नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५५ वाहन चालकांविरोधात दंडात्मक कारवाई करण्यात येऊन दंड वसूल करण्यात आला.



## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ जून

१) श्री.नारायण सदाशिव केळकर अलिबाग, ९-६-१९४७
२)श्री.अनिल दत्तात्रेय सिनकर मु.उमटे, अलिबाग ९-६-१९४७
३)श्रीम.विजया विश्वनाथ मोहिते, कोळी-वाडा,अलिबाग ९-६-१९५२
४)श्री.शरद गिरीधर पाटील चेंढरे, अलिबाग ९-६-१९६१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-**
८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**
**दुर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**

# बॉडी शॉपमध्ये ब्रेललिपीचा प्रयोग

**। उरण । प्रतिनिधी ।**

**द बॉडी शॉप हा प्रतिष्ठित ब्रिटीश निर्मित आंतरराष्ट्रीय एथिकल ब्युटी ब्रँड मुंबईतील पॅलेडियम मॉलमधील आपल्या ॲक्टिव्हीस्ट वर्कशॉप स्टोअरमध्ये आता दृष्टिदोष असलेल्या ग्राहकांना सर्वोत्तम शॉपिंग अनुभव देण्यासाठी ब्रेल वैशिष्ट्ये सादर करत भारतात आपला १८वा वर्धापन दिन साजरा करत आहे. द बॉडी शॉपचा हा अद्वितीय नाविन्यपूर्ण पुढाकार देशभरातील त्यांच्या स्टोअर्समध्ये टप्प्याटप्प्याने घेतलेल्या दृष्टिकोनाचा भाग असेल, जो ब्रँडच्या सर्वसमावेशकता व उपलब्धतेप्रती सुरु असलेल्या प्रयत्नांमधील मोठा टप्पा आहे.**




डिसॅबिलिटी राइट्स ॲक्टिव्हीस्ट व युथ कलेक्टिव्ह कौन्सिल सदस्य विराली मोदी यांच्या सल्ल्यामधून प्रेरित ब्रेल वैशिष्ट्यांमध्ये स्टोअरमधील कॅटेगरी कॉल-आऊट्सचा समावेश आहे, ज्यामधून सर्वांगीण सर्वसमावेशक शॉपिंग अनुभव मिळतो. द बॉडी शॉपच्या व्यवसाय धोरणांमध्ये भारतातील उदयोन्मुख चेंजमेकर्सच्या मतांना समाविष्ट करण्यासाठी ऑगस्ट २०२३मध्ये वायसीसीची स्थापना करण्यात आली, ज्याद्वारे अधिक युवा-केंद्रित, शाश्वत व सर्वसमावेशक दृष्टिकोनाला चालना दिली जात आहे. हा नवीन उपक्रम कंपनीची जेण्डर-न्यूट्रल उत्पादन श्रेणी आणि वैविध्यपूर्ण कर्मचारीवर्गापलीकडे शॉपच्या सर्वसमावेशकतेचा विस्तार करतो.

दक्षिण आशियाच्या मुख्य ब्रँड अधिकारी हरमीत सिंग म्हणाल्या की, आम्हाला मुंबईतील आमच्या ॲक्टिव्हीस्ट वर्कशॉप स्टोअरमध्ये ब्रेलचा समावेश करण्याची घोषणा करताना आनंद होत आहे. ही घोषणा भारतातील आमच्या १८व्या वर्धापन दिन साजरीकरणाशी संलग्न आहे. सर्वसमोवशक नियुक्तीपासून ब्रेलच्या समावेशापर्यंत एथिकल ब्युटी उपलब्ध करून देत आहोत. आमचा सर्वांसाठी सर्वसमावेशक इन-स्टोअर अनुभवांची खात्री घेण्याचा मनुसबा आहे, जे द बॉडी शॉपच्या दृष्टिकोनाशी संलग्न आहे.

# एसटीची कंटेनरला धडक



**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

मुंबई - पुणे महामार्गावर शुक्रवारी एसटी बसने समोर उभ्या असलेल्या कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात बसमधील ६ प्रवाशी किरकोळ जखमी झाले आहेत.

मुंबई - पुणे महामार्गावर कराडवरून मुंबईकडे जाणारी एसटी बस (एमएच-१४-बीटी-५९३६) बोरघाटात आली असता समोर उभ्या असलेल्या टाटा कंटेनर (सीजी-०४-एलडब्लू-०१७१) ला जोरदार धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात बस मधील ६ जणं किरकोळ जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# वृक्ष लागवड, संवर्धन मोहीम

**। तळा । वार्ताहर ।**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने तळा नगरपंचायतीतर्फे नगरपंचायत कार्यालयाच्या मोकळ्या जागेत, अंबेळी डंपिंग ग्राऊंड जागेत वृक्षारोपण व संवर्धन मोहिम माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत शुभारंभ मुख्याधिकारी विराज लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. सर्वत्र होणारी वृक्षतोड त्या बदल्यात न होणारी लागवड याचा परिणाम वातावरणावर होत असून दरवर्षी उष्णतेत मोठी वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे पावसाळ्यात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्याच्या सूचना शासन स्तरावरून केल्या जात आहेत. दरवर्षी नगरपंचायतीच्या माध्यमातून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून झाडे लावली जातात.



यावर्षी अधिकाधिक झाडे लावून त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प विराज लबडे यांनी केला असून तशा सूचना त्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या आहेत. यानुसार जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने नगरपंचायतीच्या मोकळ्या जागेत अंबेळी डंपिंग ग्राऊंड जागेत वृक्षारोपण व संवर्धन मोहिमेचा शुभारंभ करून माझी वसुंधरा शपथ घेण्यात आली.

## सुधागडात पावसाचे जोरदार आगमन

**पाली :** हवामान खात्याच्या अंदाजानुसार राज्यात पावसाळा सुरुवात झाली असून रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात शुक्रवारी (दि.६) पावसाने विजांच्या गडगडांसह बरसायला सुरुवात केली. दुपारनंतर पावसाने अचानक जोरदार हजेरी लावली. यामुळे नागरिकांची पुरता धांदल उडाली. घराबाहेर पडलेल्यांना पावसापासून बचाव करण्यासाठी छताचा आधार घ्यावा लागला. गेल्या काही दिवसांपासून सुधागडाच्या काही भागात तुरळक तर काही भागात जोरदार पाऊस पडत आहे. वातावरणात देखील बदल होत असून काही दिवसांपासून उकाडा देखील वाढला आहे. परंतु, शुक्रवारी पावसाने केलेल्या जोरदार सुरुवातीमुळे नागरिकांना उकाड्यापासून तुर्तास दिलासा मिळाला. शेतकऱ्यांची पावसाळ्यापूर्वीची शेती मशागतीची कामे देखील अपूर्णच आहेत. मात्र, आता पावसाने हजेरी लावल्याने शेतीचे कामाला देखील वेग येत आहे.

# गटांराचे काम धिम्यागतीने

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड समुद्रकिनारी सुशोभीकरणाचे काम नगरपरिषदेच्यावतीने सुरू असून गटाराचे काम धिम्यागतीने सुरू आहे. यामुळे पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी नाराजी दर्शवली आहे. हे काम लवकरात लवकर करुन त्यावर ढापे बसवावे या करिता पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्यावतीने मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

समुद्रकिनारी ज्याठिकाणी टपरी लावल्या जातात त्याच ठिकाणी मोठे गटार बांधण्यात येत आहेत. यामुळे येणाऱ्या पर्यटकांना उभे किंवा बसण्याकरिता नाहक त्रास होत आहे. या गटाराचा उपयोग फक्त पावासाचे पाणी जाण्यासाठी बांधण्यात येत आहे. परंतु, येथील दुकानादार व अन्य लोकांकडून जर या ठिकाणी कचरा टाकण्यास सुरुवात केली तर या ठिकाणी दुर्गंधी होऊ शकते. याचा परिणाम येथील व्यवसायावर होऊ शकतो.



तसेच, काम सुरू असलेल्या गटारात कोणीही पडून दुखापत होऊ शकते. तरी मुख्याधिकारी साहेबांनी याकडे लक्ष देऊन ठेकेदारांकडुन गटाराचे काम जलदगतीने करुन त्यावर ताबडतोब ढापे बसवावे. जेणे करुन पर्यटक या ठिकाणी थांबतील. नाहीतर सर्व टपरीधारक आर्थिक संकटात सापडून उपासमारीची वेळ येऊ शकते. तरी मुख्याधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे आवाहन अरविंद गायकर व पदाधिकारी यांनी निवेदनाद्वारे केले आहे.

# बेपत्ता महिलेचा खांदेश्वर पोलिसांनी लावला छडा

**। पनवेल । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील २७ वर्षीय महिला आपल्या कुटुंबासह गोवा येथे पिकनिकला गेली होती. दरम्यान, कलंगुट समुद्रकिनाऱ्यावरून ही महिला १८ मे रोजी बेपत्ता झाली होती. त्यानंतर पतीने गोव्यातील कलंगुट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्या अनुषंगाने गोवा पोलीस या महिलेचा शोध घेत होते. ही महिला पनवेल तालुक्यातील उसर्ली येथील रहिवासी असल्याने गोवा पोलिसांनी तपासाबाबत खांदेश्वर पोलिसांना विनंती केली. त्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत लांडगे यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या काही तासातच महिलेला शोधून काढले व नातेवाईकांच्या स्वाधीन केले.

सविस्तर माहिती अशी की, बेपत्ता महिला स्नेहा राज कांबळे, त्यांचे पती आणि कुटुंबातील इतर सदस्य गोव्याला कलंगुट समुद्रकिनारी गेले होते. यावेळी काही नातेवाईक समुद्रात पोहत असताना स्नेहा समुद्रकिनाऱ्यावरून बेपत्ता झाली होती. याबाबत बेपत्ता महिलेचे पती राज व नातेवाईकांनी कलंगुट पोलिसात तक्रार दाखल केली होती. गोवा पोलिसांनी शोध सुरू केला असता स्नेहा कांबळे पुणे येथे असल्याबाबत गोवा पोलिसांना माहिती मिळाली. मात्र, त्या ठिकाणी बेपत्ता महिला सापडली नाही. स्नेहा कांबळे खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीतील रहिवासी असल्याने गोवा पोलिसांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत लांडगे यांच्याशी संपर्क साधत महिलेचा शोध घेण्यासाठी विनंती केली. त्यानुसार पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत लांडगे यांनी गुरुवारी (दि.६) संध्याकाळी या महिलेचा शोध घेण्यासाठी पोलीस अंमलदार भाऊराव बाचकर व सचिन सरगर यांना तात्काळ रवाना केले असता बेपत्ता महिलेला खांदेश्वर पोलिसांनी अवघ्या काही तासातच पुणे जिल्ह्यातील तळेगाव-दाभाडे परिसरातील मंत्रा सिटी रहिवासी इमारतीतून शोधून काढले. याबाबत गोवा पोलिसांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत लांडगे यांचे आभार मानले. याबाबत अधिक तपास खांदेश्वर पोलिस करत आहेत.

## शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे अनावरण



**। चौक । वार्ताहर ।**

चौक तुपगाव येथे मनाचा राजा कला संस्कृती क्रीडा मंडळ तुपगाव यांच्या अथक प्रयत्नाने गुरूवारी (दि.६)शिवराज्याभिषेक दिनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ स्मारकाचे अनावरण मा.आ. मनोहर शेठ भोईर, विनोद भोईर, रवींद्र कुंभार यांच्या उपस्थितीत पार पडला. चौक हे छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू सहकारी सरनोबत नेताजी पालकर यांचे जन्मस्थळ असल्याने या गावाला मोठा इतिहास आहे. यावेळेस स्मारकाला सुशोभित आरास, रोषणाई, रांगोळ्यांची सजावट करण्यात आली होती. हा नयन रम्य दृष्टी सोहळा पाहण्यासाठी परिसरातील शिवभक्तांनी मोठी गर्दी केली होती.

# रायगडावर वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम




**। रसायनी । वार्ताहर ।**

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, प्रासोल केमिकल्स लिमिटेड आणि पिल्लेज एचओसी महाविद्यालय रसायनी यांच्या संयुक्त विद्यमानाने राजधानी किल्ले रायगड येथे गडाच्या पायथ्याशी वृक्षरोपण तसेच गडावर स्वच्छ्ता मोहीम करण्यात आली. यावेळी अरुण जाधव, प्रियेश राघवन, कलावती उपाध्याय, रोहित इंगळे, तन्मय पाटील, सौम्या पांडे, तन्वी पाटील, कृष्णा मिश्रा, अनुराग गायकवाड, शार्दुल शिंदे, सौरभ पारसी, अभय गोडबोले आदी विद्यार्थी उपस्थित होते.

**Anjuman Islam Janjira Urdu Primary School Panchkroshi, Tal-Murud-Janjira**
Applications are invited for the following posts from the academic year 2024-25 on purely temporary basis

**Walk in Interview**
Urdu medium (Semi English)

| Sr.No. | Class | Post | Qualification Required | No. of Posts |
|---|---|---|---|---|
| 1. | All | Head mistress | H.Sc./B.A./B.Sc. D.ed. | 01 |
| 2. | I to V | Assistant teacher | H.Sc. D.ed. | 05 |
| 3. | VI to VII | Assistant teacher | B.A./B.Sc. D.ed. | 02 |

The candidate willing to apply may present directly with their resume along with applications on the date of interview.
Date of Interview: - 12th June 2024. Time: - 11.00 am
Address of School: - Anjuman Islam Janjira Urdu Primary School Panchkroshi, Tal-Murud-Janjira.
Contact Number: Chairman: - 9049125556
Note: Preference will be given to experienced candidate.

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस ह्या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील नमूद मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.मनोज भरतकुमार जैन यांच्याकडून भाडेपट्टा हस्तांतरण करण्याचे ठरवले आहे. त्यासंदर्भात आमचे अशिल व विद्यमान मालक यांचे दरम्यान तोंडी स्वरूपाची बोलणी झाली आहे. सबब सदर खालील नमूद मिळकतीचे वैद्य मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी माझे आशिल यांचे सुचनेनुसार आजरोजी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

संदर्भित जमिन मिळकत ही पुर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहीत असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या आशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांच्या अवधित माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैद्य मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

गाव मौजे अलिबाग स.नं.२९अ/१ मधील महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ) (म्हाडाच्या) कोड नं.२ मधील भुखंड क्र.९७, क्षेत्र ९० चौ.मी.हा मोकळा भुखंड

अलिबाग,
दिनांक : ०८/०६/२०२४

सही/-
**ॲड.अनघा तुरकर (कोळी)**
ॲडव्होकेट
'पर्णकुटी' दैनिक कृषीवल प्रेससमोर
गोंधळपाडा, वेश्वी, अलिबाग

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीसमोर लिहीलेल्या मालक/कब्जेदाराकडून आमचे अशिल कायम खरेदी करण्याच्या विचारात आहेत. सदर मालक/कब्जेदार आमचे अशिलांकडून ठरलेली किंमत स्वीकारून रजिस्टर्ड खरेदीखत निष्पादीत करून देणार आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४१/१/ब | १-२०-०० पैकी ०-४०-०० | १२.४४ | प्रिती दिपक शहा |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुलहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक/कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व रजिस्टर्ड खरेदीखत निष्पादीत करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सही/-
**श्री.पराग प्रफुल्ल म्हात्रे**
ॲडव्होकेट हाय कोर्ट व नोटरी भारत सरकार ११,
केशव वसंत, जुने तहसील कार्यालयासमोर, पनवेल,
ता.पनवेल जि.रायगड ९८३३७३८७११

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १. हरिभाऊ वाळकु लाड, २. गणेश हरिभाऊ लाड, यांनी जमीन मालक १. दिपेश नारायण पाटील, २. मनिष नारायण पाटील, यांचेकडून त्यांचे ताबेकाब्जा वहिवाटीच्या, खालील वर्णनाच्या जमीन मिळकती, कायमच्या विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**-: मिळकतींचे वर्णन :-**
**मौजे गणेगाव चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकती**

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | ५५/१/ब | ०.६७.८० या एकूण क्षेत्रापैकी लिहून देणार यांचे हिस्स्याचे व भोगवटासदरी नावे असलेले ०.२०.०० हे. आर. पॉ. इतके क्षेत्र विकत दिलेले आहे | १.६६ |
| २ | ५६/५ | ०.१८.५० | २.४४ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही, व कसल्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, ७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट, यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. ०९/०६/२०२४ कळावे

**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री.साई सावली, सो.लि., रूम नं. १०, दुसरा माळा
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीमती. सुनंदा जनार्दन घाणेकर, २) श्री. सुरेश जनार्दन घाणेकर, ३) श्री. सुनील जनार्दन घाणेकर, ४) श्री. अनिल जनार्दन घाणेकर, ५) जान्हवी जनार्दन फाळके व ६) प्रचिती प्रकाश पाटील उर्फ मनिषा जनार्दन घाणेकर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले असून तसा रितसर साठेकरार त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभात स्वाक्षरीत केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| सातिर्जे | २७७ | १-१३-५० | २८.९२ |
| | | पो. ख. ०-१५-१० | |
| | | १-२८-६० | |

पैकी पश्चिमेकडील ० हे. ५० आर व पुर्वेकडील ० हे. ४.६० आर (६ मिटर रुंदीच्या रस्त्याकरीता) मिळून एकूण ० हे. ५४.६० आर एवढी मिळकत, यापुढे 'सदर मिळकत' असे संबोधण्यात आलेली.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ९/६/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ओ / १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी, अलिबाग,
रायगड, ४०२ २०१.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय२५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- N.A . प्लॉट पाहिजेः ४ ते ५ गुंठे, अलिबाग-पोयनाड रस्त्यावर चेंढरे मारुती मंदिरापासून वेश्वीच्या RCF कॉलनीच्या पुढे अर्धा किलोमीटर पर्यंत. मुख्य रस्त्यापासून प्लॉटपर्यंत १२मीटरचा पक्का रस्ता असणे आवश्यक. जमिनीचा उतारा व नकाशा पाठविणे ही पूर्वअट आहे. टायटल क्लियर असल्यास, जागा व किंमत पसंत पडल्यास त्वरित व्यवहार पूर्ण करण्याची हमी एजंट क्षमस्व, संपर्क : ९००४०३१६९५.
- ५०००० रूपये किमतीचा CNC मशीन ऑपरेटिंगचा कोर्स मोफत, मोफत, मोफत. पात्रता : १२ वी किंवा १५ वी पास, वयोमर्यादा- ३० वर्षे पर्यंत. पगार- १०००० रूपये, ८ तास ड्युटी, संपर्क : ९०४९६५५५२३
- इलेक्ट्रिकल (वायरिंग) कामासाठी गरजू मुलांची (हेल्पर) गरज आहे. चेंढरे गोंधळपाडा ९२७०६१४०७७
- Vacancies for office staff in Alibag. For interview call 9422383099 Time to call 10 am to 5 pm

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# विश्वचषक विजेत्या खेळाडूंचा इशारा

## जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव ठरणार महत्त्वाचे खेळाडू

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

**टी-२० विश्वचषकमध्ये रविवारी (९ जून) भारत आणि पाकिस्तान हे पारंपारीक संघ एकमेकांविरोधात भिडणार आहेत. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ८ वाजता न्युयॉर्कमधील नसाऊ काऊंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. अनेक चाहते आतुरतेने या सामन्याची वाट पाहत आहेत.**



भारताने न्युयॉर्कमध्ये पहिला सामना आयर्लंडविरुद्ध खेळला आहे. ज्यात भारताने विजय मिळवला होता. पण पाकिस्तानला न्युयॉर्कमध्ये खेळण्याचा अनुभव नाही, त्यांनी डेलासमध्ये अमेरिकेविरुद्ध या स्पर्धेतील पहिला सामना खेळला आहे. त्यांना त्यात सुपर ओव्हरमध्ये पराभवाचा सामना करावा लागला होता. दरम्यान, याचाच फायदा भारताला होऊ शकतो, असे माजी कर्णधार हरभजन सिंगने म्हटले आहे.

याबरोबरच हरभजनने भारतासाठी महत्त्वाचे ठरू शकणाऱ्या दोन खेळाडूंबद्दलही सांगितले असून प्लेइंग इलेव्हनमध्ये काय बदल व्हायला हवा हे सांगितले आहे. एएनआयशी बोलताना हरभजन सिंग म्हणाला, या मैदानात भारत आधी खेळला असल्याने त्याचा फायदा भारताला होईल, पण पाकिस्तान पाटा खेळपट्टीवर खेळल्यानंतर भारताविरुद्ध खेळणार आहे. पाकिस्तानसाठी हे आव्हान असेल. त्यांना अमेरिकेविरुद्ध पराभूत झाल्यानंतर या परिस्थितीत स्थिरावणे अवघड असणार आहे. भारतीय संघ चांगला खेळत असल्याने त्याचा फायदा होईल.

याशिवाय हरभजन म्हणाला की, पाकिस्तानविरुद्धच्या आगामी सामन्यात जसप्रीत बुमराह आणि सूर्यकुमार यादव हे महत्त्वाचे खेळाडू ठरू शकतात. हे दोन्ही खेळाडू मॅच विनर्स आहेत. त्याबरोबर हरभजनने एक बदल सुचवताना म्हटले की, कुलदीप यादव विकेट्स घेणारा गोलंदाज आहे. त्याच्याकडे गोलंदाजीतील विविधताही आहे. त्यामुळे तो खेळायला पाहिजे. मला वाटते जेव्हापासून भारताला ८ व्या क्रमांकावर फलंदाजाची गरज भासली, तेव्हापासून अक्षर पटेलला प्लेइंग इलेव्हनमध्ये खेळवण्यात आले. भारताने आयर्लंड विरुद्ध झालेल्या सामन्यात कुलदीप यादवला प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी दिली नव्हती. भारताने फिरकी गोलंदाज म्हणून अक्षर पटेल आणि रविंद्र जडेजा या दोघांना खेळवले होते.

# आयर्लंड उलटफेरची शिकार

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**


रंगतदार सामन्यात कॅनडा १२ धावांनी विजयी

शेवटच्या ओव्हरपर्यंत गेलेल्या चुरशीच्या सामन्यात कॅनडाने उलटफेर केला आहे. कॅनडाने आयर्लंडवर १२ धावांनी विजय मिळवला आहे. कॅनडाने आयर्लंडला विजयासाठी १३८ धावांचे आव्हान दिले होते. आयर्लंडने या धावांचा १९ व्या ओव्हरपर्यंत शानदार पाठलाग केला. त्यामुळे सामना रंगतदार स्थितीत पोहचला. आयर्लंडला विजयासाठी शेवटच्या ६ चेंडूत १७ धावांची गरज होती. मात्र जेर्मी गॉर्डन याने १७ धावांचा शानदार बचाव केला. आयर्लंडला अवघ्या ५ धावाच करता आल्या.

यूएसए विरुद्ध पाकिस्तान सामन्यानंतर क्रिकेट चाहत्यांना २४ तासात दुसरा उलटफेर पाहायला मिळाला. यूएसएने पाकिस्तानला पराभूत केल्यानंतर आता कॅनडाने तुलनेत अनुभवी असलेल्या आयर्लंडला पराभवाची धुळ चारली आहे. आयर्लंडच्या सलामी जोडीने विजयी धावांचा पाठलाग करताना २६ धावांची भागीदारी केली. मात्र, त्यानंतर कॅनडाने ठराविक अंतराने झटके दिले. त्यामुळे आयर्लंडची स्थिती ६ बाद ५९ अशी झाली. मात्र, त्यानंतर जॉर्ज डॉकरेल आणि मार्क एडायेर या दोघांनी सातव्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी करत आयर्लंडला सामन्यात कायम ठेवले. त्यामुळे विजयाच्या आशा कायम राहिल्या. आयर्लंडला शेवटच्या ओव्हरमध्ये १७ धावांची गरज होती. जेर्मी गॉर्डन याने शेवटची ओव्हर टाकली. जेर्मीने दुसऱ्या बॉलवर मार्क एडायरला ३४ धावांवर कॅच आऊट करत ही जोडी फोडली आणि कॅनडाचा विजय निश्चित केला. डॉकरेल आणि एडायेर या दोघांनी सातव्या विकेटसाठी ६२ धावांची भागीदारी केली. त्यानंतर जेर्मीने हुशारीने उर्वरित ४ बॉल टाकून कॅनडाला विजयी केले.

# कार्लोस फायनलमध्ये

**। फ्रान्स । वृत्तसंस्था ।**

कार्लोस अलकराझने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या जेनिक सिनेरचा पराभव करत फ्रेंच ऑपनची फायनल गाठली. कार्लोसने जेनिकचा २-६, ६-३, ३-६, ६-४, ६-३ असा पाच सेटमध्ये रंगलेल्या सामन्यात पराभव केला आहे.

स्पेनचा २१ वर्षाचा कार्लोस आता अलेक्झांडर झ्वेरेव किंवा कॅस्पर रूड या दोघांपैकी एकासोबत अंतिम सामना खेळणार आहे. अंतिम सामना हा रविवारी होणार आहे. फ्रेंच ओपनची फायनल गाठणारा कार्लोस हा ग्रँड स्लॅम च्या तीनही सर्फेसवर अंतिम फेरी गाठणारा सर्वात कमी वयाचा टेनिसपटू ठरला आहे. स्पेनच्या या टेनिसपटूने गेल्या वर्षी विम्बल्डनची फायनल आणि २०२२ मध्ये युएस ओपनची फायनल गाठली होती. त्याने फायनल जिंकली, तर तो तीन ग्रँडस्लॅम जिंकणारा सर्वात तरूण टेनिसपटू ठरणार आहे. यापूर्वी हा रेकॉर्ड स्पेनच्याच राफेल नदालच्या नावावर आहे.



**तीनही ग्रँडस्लॅम सर्फेसवर फायनल खेळणारे सर्वात तरूण टेनिसपटू**

**कार्लोस अलकराझ - २१ वर्षे १ महिना**
**आंद्रे आगासी - २२ वर्षे १ महिना**
**बजॉर्न बोर्ग - २२ वर्षे २ महिने**
**राफेल नदाल - २२ वर्षे ६ महिने**
**जिम कुरियर - २२ वर्षे १० महिने**

# अमेरिकेच्या संघात गुजरातचा धोनी

**। डलास । वृत्तसंस्था ।**

अमेरिकेने टी-२० विश्वचषकाच्या एका रोमांचक सामन्यात पाकिस्तानला हरवले. या सामन्यामध्ये अमेरिकेच्या विजयात काही भारतीय वंशाचे खेळाडू हिरो ठरले आहेत. या टीममध्ये एक असा खेळाडू होता. ज्याने एमएस धोनीसारखा खेळ केला आणि अमेरिकेला विजय मिळवून दिला.

अमेरिकेच्या डलासमध्ये ६ जूनला पाकिस्तान विरुद्ध अमेरिका सामना झाला. हा ११ वा सामना होता. असा निकाल लागेल, त्याची कोणी कल्पनाच केली नव्हती. अमेरिकेसारख्या नवख्या संघाने बलाढ्य पाकिस्तानला पराभवाच पाणी पाजले. त्यामुळे या पराभवाची सर्वाधिक चर्चा होत आहे. दोन्ही संघामध्ये ४० ओव्हरची मॅच झाली. पण निकाल लागू शकला नाही. म्हणून ४१ वी म्हणजे सुपर ओव्हर झाली. त्यातून सामन्याचा जो निकाल लागला. त्याने सगळ्यांनाच धक्का बसला. एक मोठा उलटफेर झाला. त्यात अमेरिकेचा कॅप्टन मोनंक पटेलने महत्त्वाची भूमिका बजावली. त्यासाठी प्लेयर ऑफ द मॅच म्हणून त्याची निवड झाली. या



### मोनंकची वनडेमध्ये कामगिरी कशी आहे?

**अमेरिकेला विजय मिळवून देण्याची त्याची ही पहिली वेळ नाही. २०१८ सालच्या आयसीसी वर्ल्ड टी-२० क्वालिफायरम ध्ये अमेरिकेकडून त्याने सर्वाधिक धावा केल्या होत्या. ६ सामन्यात त्याने २०८ धावा केल्या होत्या.**

सामन्यात मोनंक पटेल अमेरिकेसाठी एमएस धोनी बनला. पहिल्यांदाच या संघाने पाकिस्तान सारख्या बलाढ्य संघाला पराभवाचे पाणी पाजले. या विजयात संपूर्ण संघाने शानदार प्रदर्शन केले. यात विकेटकीपर कॅप्टन मोनंक पटेलचा रोल महत्त्वाचा होता. टुर्नामेंट सुरु होण्याआधीच त्याने आपल्या संघाचा विश्वास जिंकला होता. मोनंकने स्वत:ला सिद्ध केले आहे. संपूर्ण सामन्यात एक क्षणही असे वाटले नाही की, असोसिएट नेशन पहिल्यांदा वर्ल्ड कप खेळत आहे.

मोनंक पटेलने धोनीसारख काय केलं?

मोनंक पटेलने धोनीसारखी परफेक्ट प्लानिंग करुन मैदानावर त्याची अम लबजावणी केली. सुरुवातीला त्याने गोलंदाजांचा खुबीने वापर केला व पाकिस्तानवर दबाव आणला. त्यांनी सामना खिशात घातला.

# रोहित शर्मा पुन्हा जखमी

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

विश्वचषकामध्ये ९ जून रोजी भारत विरुध्द पाकिस्तान सामना रंगणार आहे. न्यूयॉर्कमध्ये खेळल्या जाणाऱ्या या सामन्यापूर्वी रोहित शर्माच्या दुखापतीमुळे टीम इंडियाचे टेन्शन खूपच वाढले आहे. पण, त्यातला त्यात दिलासादायक बाब म्हणजे रोहित शर्मा हा पुन्हा फलंदाजी करताना दिसला आहे. खरं तर, डाव्या हाताला दुखापत झाल्यानंतर तो वेदनेने कळवळत होता, ते पाहून फिजिओ टीम त्याच्या दिशेने धावत आली. फिजिओने उपचार दिल्यानंतर रोहित पुन्हा नेटमध्ये फलंदाजी करताना दिसला. रोहित शर्माला याआधी आयर्लंडविरुद्धच्या सामन्यात खांद्याला दुखापत झाली होती. त्यानंतर त्याला तिथेही मैदान सोडावे लागले होते.


### रोहितला कशी झाली दुखापत ?

**सरावादरम्यान, रोहित शर्माला दुखापत कशी झाली? हा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, रोहित शर्मा थ्रो डाउन स्पेशालिस्ट नुवानच्या चेंडूवर फलंदाजी करत होता. त्यावेळी खेळपट्टीवरून एक चेंडू उसळला आणि त्याच्या डाव्या हाताच्या ग्लोव्हला लागला. त्यानंतर त्याला भयानक वेदना झाल्या. मात्र, फिजिओने त्याला तपासल्यानंतर त्याला बरे वाटू लागले. रोहितने पुन्हा फलंदाजीला सुरुवात केली पण यावेळी त्याने आपली बाजू बदलली. म्हणजे दुखापतीनंतर तो दुसऱ्या टोकाकडून फलंदाजी करत होता. नेटमध्ये आणखी काही वेळ फलंदाजी केल्यानंतर रोहित शर्मा तिथून निघाला.**

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ९ जून ते १५ जून २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## सावधान राहा




**मेष :** मेषराशीधारकांना आपले ग्रहमान पाहता कारण आपल्याला एकापेक्षा जास्त स्रोतांकडून पैसे मिळण्याची शक्यता दिसते. कार्यालय किंवा कार्यालयात आपल्या हाताखालच्या लोकांवर अधिक विश्वास ठेवू नका कारण जर आपण असे केले तर ते आपल्या विश्वासाचा फायदा बेकायदेशीरपणे घेऊ शकतात आणि आपल्यास गुप्तपणे नुकसान करण्याचा प्रयत्न करतील ज्यामुळे कार्यालयातील आपली प्रतिमा खराब होऊ शकते. आपली जवळची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल. कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका, आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **महिलाना-** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकालआप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील **शुभ दिनांक** - ११,१२

## चांगली बातमी मिळेल



**वृषभ :** वृषभराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता नोकरी व्यवसायात परिवर्तनामुळे घरापासून दूर राहावे लागेल. आपले कुटुंबीय एका मजबूत भिंतीसारखे तुमच्यासोबत ठामपणे उभे राहतील. विद्यार्थ्यांसाठी वेळ अनुकूल आहे. स्पर्धेचा निकाल आपल्याला प्रसन्न करेल, ही विद्यार्थी वर्गासाठी चांगली बातमी आहे. मिळकतीचे नवे पर्याय उपलब्ध होतील. प्रॉपर्टीत गुंतवणुक करणे फायद्याचे ठरेल ऑफिसमध्ये सह-कर्मचारींचे वागणे सहाय्यभूत ठरेल. कुठे तरी बाहेर जाण्याचा कार्यक्रम ठरू शकतो. जोडीदारासोबत खास क्षण घालवू शकाल. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. **महिलाना-** संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा. महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील **शुभ दिनांक**- १३,१४

## बदल फायद्याचा ठरेल




**मिथुन :** मिथुनराशीसाठी आपले ग्रहमान पाहता, या कालावधीत नोकरी बदलण्यापासून तुम्हाला बरेच फायदे मिळू शकतात आणि हा बदल तुमच्या कारकीर्दीसाठी खूप चांगला असल्याचे सिद्ध होईल. दुसरीकडे, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याची संधी मिळू शकते. या काळात बऱ्याच परीक्षांमध्ये विद्यार्थी चांगली कामगिरी करतील आणि परिणाम म्हणून खूप चांगल्या गुणांसह उत्तीर्ण होतील. जर आपण काम करत असलात तर आपल्याला आपल्या कामाकडे पूर्ण लक्ष द्यावे लागेल अन्यथा आपल्याला आपल्या कार्यालयात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या राशीच्या लोकांना सप्ताहात व्यवसाय भागीदारीत अनेक आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. परदेशी व्यापारी लोकांसाठी वर्ष खूप अनुकूल ठरू शकते. यामुळे बरेच परदेशी संपर्क स्थापित केले जातील जे आपल्याला दूरगामी लाभ देतील आणि आपल्याला समाजात चांगले स्थान मिळेल. **महिलांना-** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. **शुभ दिनांक-** १४,१५

## खर्चात वाढ




**कर्क :** कर्कराशीधारकास या सप्ताहात आपण थोडे आराम अनुभवाल आणि आरोग्यावरही त्याचा महत्त्वपूर्ण परिणाम होईल. सुरुवातीपासूनच ग्रह तुमच्या राशीला चांगले परिणाम देतील. विशेषतः हा कलावधी आपल्या आरोग्यावर आणि खर्चांवर परिणाम करेल आणि आपला खर्च अनपेक्षितपणे वाढू शकेल. काही वेळा अति घेतलेला ताण आरोग्याच्या कारणास्तव त्रास देऊ शकते. परंतु सध्याची ग्रह स्थितिची सकारात्मक बाजू अशी आहे की जर आपण परदेशात जाण्यास तयार असाल तर तुमची इच्छा पूर्ण होऊ शकते. विशेषत: आखाती देशांमध्ये आपण सहजपणे प्रवेश करण्यास सक्षम असाल. ग्रहांचा आणखी परिणाम मुख्यतः तुमच्या शिक्षणावर, तुमच्या मुलांवर, तुमच्या प्रेमाच्या आणि तुमच्या शारीरिक सुखांवर परिणाम होईल. आपण आपले वाहन घेण्यास सक्षम असाल. **महिलांना-** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. मोठ्या व्यक्तिनचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. **शुभ दिनांक** -९,११.

## आव्हानांचा सामना




**सिंह :** सिंहराशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. या राशीच्या लोकांना या सप्ताहात काही आनंद आणि काही आव्हानांसह पुढे जावे लागणार आहे. आपण प्रत्येक आव्हानाला दृढपणे सामोरे जाण्यास सक्षम झाल्यास तर या कालावधीत उत्कृष्ट होण्यास कोणीही रोखू शकणार नाही. या सप्ताहात आपणास काही क्षेत्रात आव्हानांचा सामना करावा लागेल, विशेषत: आपले आरोग्य आणि करिअर यात आव्हान असेल. हे दिवस प्रेमजीवनासाठी अनुकूल ठरू शकते, त्याच प्रमाणे कौटुंबिक जीवन, विवाहित जीवन, विवाह, मुले, शिक्षण आणि आर्थिक परिस्थितीसाठी खूप अनुकूल ठरू शकते. याचा प्रभाव मुख्यतः आपल्या कामाचे क्षेत्र, आपले कौटुंबिक जीवन, आपली वाणी, आपले आरोग्य आणि आपल्या मुलांवर होईल. कधी कडू गोड प्रसंगानेआपले विवाहित जीवन उतार-चढाव ने भरलेले असेल **महिलाना-** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभदिनांक**- १०,१३

## सल्ला घ्या



**कन्या :** कन्याराशीसाठी या सप्ताहात सुरवातीला कोणत्याही प्रकारच्या आर्थिक गुंतवणुकीसाठी या राशीच्या लोकांनी अत्यंत सावधगिरीने पुढे जावे. या क्षेत्रातील तज्ज्ञ किंवा तज्ज्ञांकडून सल्ले घेऊन कोणतेही कार्य केले तर यश त्यांना नक्कीच यश मिळेल. सामाजिक जीवनासाठी देखील हे वर्ष चांगले ठरेल आणि त्या व्यतिरिक्त आपण आपले वैयक्तिक संबंध अधिक अनुकूल बनवू शकता. तुम्हाला हे लक्षात ठेवायला पाहिजे की प्रेम आणि नातेसंबंध ओळखी, आपुलकीने आणि प्रेमाने चालतात. कोणत्याही नात्यात हट्टीपणा करून कोणतीही कृती करू नका. आपल्या सभोवताल चांगले वातावरण तयार करण्यावर आपले सर्व लक्ष केंद्रित करा. आपल्या आजूबाजूची काळजी घ्या कारण असे काही लोक आहेत जे आपले नुकसान करण्याचा विचार करीत आहेत, त्यांच्यापासून सावध राहा आणि कोणतेही नवीन कार्य करताना त्या सर्व बाबींचा विचार करा. आपण करारावर सही करण्यास जात असल्यास, त्यातील प्रत्येक विषय वाचा आणि कोणालाची हमी घेऊ नका. **महिलांना-** आपणास आपला रागही नियंत्रणात ठेवावा लागेल कारण आपण एखाद्या कारणावरून वेळोवेळी भांडणे किंवा वाद घालू शकता. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **शुभदिनांक**-९,१२

## प्रगती कराल




**तुळ :** - तुलराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता, या कालावधीत आपल्याला बरेच दुर्गम प्रवास करावे लागणार आहे. जे आपल्यासाठी खूप फायदेशीर ठरतील आणि त्याद्वारे आपल्याला चांगले पैसे मिळतील आणि त्याच वेळी आपला सन्मान ही वाढेल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले हा सप्ताह आपल्यासाठी खूप प्रगतिशील असल्याचे सिद्ध होऊ शकते. आपल्याला या सप्ताहात आव्हानांच्या दरम्यान चांगला अनुभव मिळेल. आपल्याला केलेल्या प्रयत्नांचे चांगले परिणाम मिळतील आणि आपण अधिक मेहनत घेत राहिल्यास निश्चितच दिवस चांगले सिद्ध होऊ शकतील. आपणास जीवनात स्थिरता आवडते आपण या दिशेने प्रयत्न केल्यास तुम्हाला नक्कीच यश मिळेल. मधील भविष्यावाणी अशी आहे की आपणास आपल्या मार्गावर येण्यासाठी आणि योग्य वेळी भिन्न पर्याय निवडावे लागतील तेव्हाच तुम्ही चांगले वातावरण उपभोग करू शकाल. **महिलाना-** आपण कोणत्या प्रकारचे निर्णय घेता हे महत्त्वाचे असेल कारण त्या निर्णयांचा मुख्यतः आपल्या कौटुंबिक आणि व्यावसायिक जीवनावर परिणाम होईल. शुभदिनांक- ११,१४

## दुसऱ्यावर ढकलू नका




**वृश्चिक :** वृश्चिकराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपले काम दुसऱ्यापुढे ढकलू नका आणि स्वतःची कामे स्वत: करण्याची सवय लावा. विलंब आपल्यासाठी मारक ठरू शकतो त्यामुळे जसे जमेल तसे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करा यश मिळेल. या कालावधीत आपल्या अनेक इच्छा पूर्ण होऊ शकतात, ज्यामुळे तुम्ही आनंदी राहाल आणि दीर्घ काळापासून अडकलेली कोणतीही योजना पूर्ण होईल ज्याचा तुम्हाला चांगला फायदा होईल. आपल्या पालकांच्या आरोग्याची काळजी घ्या, कारण त्यांच्या सेवेशिवाय नशीब आणि आनंद मिळविणे अशक्य आहे. तसेच आपल्या कामाच्या क्षेत्राकडे थोडेसे लक्ष द्या कारण आपल्याविरुद्ध काही कट रचले जाऊ शकतात किंवा कोणीतरी आपल्याविरोधात हालचाल करू शकते ज्यामुळे आपल्याला बदनामी सहन करावी लागेल. आपले कार्य पूर्ण प्रामाणिकपणाने करा आणि कोणालाही अशी संधी देऊ नका की आपल्याला कोणत्याही समस्येचा सामना करावा लागेल **महिलांना-** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला. त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **शुभ दिनांक-** ९,१५

## यशाचा झेंडा फडकणार




**धनु :** धनुराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीच्या लोकांना आता खूप चांगले परिणाम मिळणार आहे. या कालावधीत प्रामुख्याने तुम्हाला करिअर आणि व्यवसायात यश मिळेल आणि तुम्ही तुमच्या यशाचा झेंडा फडकवाल जे मनात येईल ते कराल. परंतु प्रामुख्याने आपल्याला आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल कारण ह्या कालावधीत आरोग्याची समस्या आपल्यासाठी सर्वात मोठी चिंता असू शकते. तरीही आपल्या जीवनात प्रेमाची बहार येईल आणि आपण वेळोवेळी लव्ह लाईफचा आनंद घ्याल. विवाहित जीवनात कोणतीही मोठी समस्या उद्भवणार नाही. छोट्या-छोट्या भांडणामुळे काहीही फरक न पडता वैवाहिक जीवनात आनंद कायम राहील. परदेशात जाण्याची इच्छा असणाऱ्यांना, ती पूर्ण करता येईल आणि त्यांना नवीन घर बांधण्याची संधी देखील मिळू शकेल. **महिलांना-**आपला जोडीदार आपल्या प्रत्येक कामात आपले समर्थन करेल आणि वेळ आल्यावर नक्कीच मदत करेल. याचा परिणाम म्हणून तुमचे विवाहित जीवन चांगले राहू शकते. आपल्याला पैशांची चिंता करण्याची आवश्यकता नाही शुभदिनांक- १०,१४

## कडू-गोड अनुभव



**मकर :** मकरराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता सर्व काही ठीक चालले आहे. लहानमोठया समस्या सोडल्या तर हा सप्ताह उत्तम चालला आहे. हा कालावधी कडू-गोड अनुभवांचा असेल. याची सुरूवात तर चांगली असेल, पण शेवटी काही समस्या भेडसावू शकतात. दीर्घ यात्रा फायदेशीर तर असतील पण यासाठी अधिक पैसेही खर्चावे लागतील. शत्रू आपल्याला त्रास देण्याचा पूरेपूर प्रयत्न करतील पण त्यांना यश येणार नाही. सप्ताहाच्या पूर्वार्धात खर्च अधिक होईल, ज्यामुळे धन संचयात अडचण निर्माण होईल. चांदीच्या तांब्यात वाहत्या नदीचे पाणी भरून ठेवल्यास फायदा होईल. या सप्ताहाच्या मध्यात सावध राहणे फारच गरजेचे आहे, कोणीतरी आपल्याविरुध्द कट रचत आहे. हलकीशी चूक आपल्याला महागात पडू शकते. एका मांगलिक कार्याचा योग जुळत आहे. सकारात्मक वातावरण कायम राहील. फार मेहनत करावी लागेल. हो, त्यानुसार फळही मिळेल. इच्छीत लाभाने आनंद होईल. **महिलांना-** स्त्रियांनी तब्येतीची काळजी घ्यावी. वजन वाढेल. नोकरीत पदोन्नती शक्य आहे. तब्येतही थोडी नाजुक राहील **शुभ दिनांक**- ११,१३

## खर्चावर नियंत्रण ठेवा



**कुंभ :** या सप्ताहाचे ग्रहमान पाहता तुम्ही चिंतित राहाल. शत्रू पक्ष तुमच्यावर हावी होऊ शकतो. भौतिक साधनांवर निरर्थक पैसे खर्च होण्याची चिन्हे दिसत आहेत. लक्षात असू द्या, क्रोध सगळ्यात आधी तुमचे नुकसान करतो, म्हणून रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. वैवाहिक जीवनात संशय घातक ठरू शकतो. या विषयावर जोडीदारासोबत चर्चा करून तोडगा काढा. बाहेर खाणे टाळा, नाहीतर आरोग्यावर याचे वाईट परिणाम दिसून येतील. तरीही तुमच्या मेहनतीचे आणि चिकाटीचे फळ तुम्हाला नक्की मिळेल. नवे वाहन किंवा घर वगैरे खरेदी करु शकता. मित्र प्रत्येक अडचणीत तुमची साथ देतील. सासरच्या लोकांकडून साहाय्य मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. कम्प्यूटर व्यवसायाशी संबंधित लोकांसाठी वेळ चांगली असरणार आहे. शत्रूंची प्रत्येक चाल अयशस्वी ठरेल. **महिलांना-** नव्या संबंधांचा फायदा होईल.काहीतरी नवे घडणारच आहे. तुमच्या अपत्याला तुमचा वेळ हवा आहे, हे ध्यानात असू द्या. सुख आणि धन प्राप्तीचे संकेत आहेत. सांध्यांचे दुखणे किंवा शल्य चिकित्सा होऊ शकेल. **शुभ दिनांक**- १२,१४

## फायदा होईल



**मीन :** मीनराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता तुम्हाला इच्छेनुसार फळ मिळेल. जोडीदार प्रसन्न आणि अपत्य संतुष्ट राहतील. एकुणच तुमच्यासाठी हा चांगला सप्ताह आहे. कोणीतरी तुमच्यावर नजर ठेवून आहे. यासाठी आपले काम पूर्ण प्रामाणिकपणे करा. सावध रहा, मेहनतीचे फळ तुम्हाला नक्की मिळेल. पण ही वेळ विद्यार्थ्यांसाठी प्रतिकूल वेळ आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी मात्र सर्वकाही सामान्य राहील. म्हणजेच मेहनतीला पर्याय नसेल. नव्या लोकांच्या ओळखी होतील, ज्या पुढे लाभदायक ठरतील. नोकरीसाठी एखाद्या नव्या शहरात जाऊ शकता. अड्कलेले धन परत मिळेल. वसूली करून घ्या. जोडीदार तुमच्यासाठी धावून येईल, त्याचे प्रेम सिद्ध होईल. जोडीदाराचे तुमच्याप्रतीचे वागणे साहाय्यकारी असेल. स्पर्धेला घाबरू नका, त्याचा आनंद लुटा. मग पाहा काम करताना किती मजा येते ती. **महिलांना-** धार्मिक कृत्यांप्रती रूची वाढवाल. तुमच्या जीवनात काहीतरी नवे होणार आहे. वाटेत काही अडचणी येतील पण तुम्ही त्या पार कराल. कुटुंबात वातावरण ठीकठाक राहील. तीर्थयात्रेचा लाभ होईल. **शुभ दिनांक**- १३,१५

मोहोर

# सत्तास्थापनेसाठी आत्मपरिक्षण गरजेचे!

"मोदी शहांना त्यांच्या विचारसरणीचा गौरव वाटत होता. या विचारधारेचा निकाल जनतेने या निवडणुकीत दिला आहे. 'व्यक्तीपेक्षा पक्ष मोठा आहे' या सिद्धांताचा भाजपला विसर पडला होता. यानिमित्ताने आता हा विचार करण्याची गरज आहे. मोदींनी २०१४, २०१९ मध्ये भाजपाचे बहुमत असताना सत्ता हाकली होती. आता घटक पक्षांच्या कुबड्या त्यांना घ्याव्या लागणार. ज्या चंद्राबाबू नायडूंवर ते अवलंबून आहेत. यांनी राजकारण करताना आपल्या आजुबाजूच्या कोणालाही सत्तेपुढे मोजले नाही. स्वतःच्या सासऱ्यांना सुद्धा नाही त्यांनी आपल्या राज्यात भाजपाबरोबर संगठन केले ते अनिच्छेनेच मनापासून तर नाहीच. त्यांना इडी, सीबीआय यांचा धाक दाखवलेला आहेच. ते मोदी पंतप्रधान होण्यासाठी खरंच पाठिंबा देतील? याची शक्यता विचारात घेण्याची गरज आहे."





आचार-विचार

डॉ. विलास पवार

लोकशाहीचा उत्सव निवडणुकांमुळे उष्णतेच्या लाटेत पार पाडला आणि उत्सवाचा शेवट निकालाने झाला. निवडणूक म्हटली तर कोणीतरी जिंकणार आणि कोणीतरी हारणार. 'संख्या' ठरवते की उमेदवार कोणता जिंकणार ते आणि ही संख्याच ठरवते की पक्ष कोणता सरकार स्थापन करणार. २०१४ आणि २०१९ ही लोकसभा एक विशिष्ट बदलाची होती. जनतेने मोदींना नुसते स्विकारले नाही तर 'मोदी' नावाची लाट आली. या लाटेत विरोधक नेस्तनाबूत झाले आणि नाकर्ते असले तरी लाटेवर आरूढ झालेले लागले. निवडणुकीत विजयी झाले. या गेल्या दहा वर्षाचा लेखाजोखा जनतेने २०२४ च्या निवडणुकीत स्पष्ट केला. यह पब्लिक है! सब जानती है. याचा प्रत्यय यावेळेच्या निकालाने किमान भाजपाला आणून दिला आहे. २०२४ चा लोकसभेच्या निवडणुकीचा निकाल ऐतिहासिक आहे. याची कारणमीमांसा राजकीय विश्लेषक आपआपल्या पद्धतीने करतीलच. पण सर्वात जास्त गरज 'भाजपा' मधील राजकारण करणाऱ्या धुरिणांना आत्मपरीक्षण करण्याची आहे. या निकालाने भाजपाच्या अनेक मनसुब्यांना तिलांजली दिली. मुळातच 'भाजपाला' असे बोलायला नकोच आहे. प्रत्येक वेळेला 'अबकी बार मोदी' सरकार अशी भलावण करण्यात येत होती. दुसरीकडे कोठेही 'मोदी की गॅरंटी'असे ठोकून सांगितले जात होते. एवढेच कशाला ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वैचारिक पाठबळ, संघटन यावर भाजपाची ताकद आणि विचारसरणी आधारीत आहे. त्या संघांच्या संबंधाबाबत मोदी आणि अमितशहांचे शिष्य जे.पी. नड्डा यांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले नाही. तर सरसकट संबंध नसल्याचा जाहीर उल्लेख केला. या सर्व घटनांकडे जर पाहिले तर भाजपा 'व्यक्तीकेंद्रीत' झाल्याचे दिसून येते. पक्ष मोठा की व्यक्ती या प्रश्नाचे उत्तर 'व्यक्ती' असे मोदींनी आणि अमित शहा यांनी लोकांना बदलून घेतले.

मोदी आणि शहा यांनी या जबरदस्तीच्या ठोकशाहीचा लोकशाही मार्गाने झालेला हा पराभव. भाजपाचा पराभव आहे असे खरेतर विरोधकांना सुद्धा क्वचितच बोलायचे आहे. देशातील प्रत्येक राज्यात आमच्या भाजपाची सत्तास्थाने असणार. आम्ही जसे करणार तसे तुम्ही ऐकायचे अशी दडपशाही स्वकीय पक्षातल्या नेत्यांवर सुद्धा लादली गेली. साधनसुचितेची विचारधारा मांडणाऱ्या आणि लोकशाहीचा मार्ग पाळणाऱ्या नेत्यांना खच्चीकरण प्रयत्न झाला. त्यांच्यावर पाळत ठेवण्याचा त्यांच्या कर्तृत्वाचे पंख कापण्याचा प्रयत्न झाला. जो आपल्या विचाराचा नाही त्याला बाजूला करण्याचा सपाटा मोदींनी आणि शहांनी सपाटून लावला होता. हे सर्व ते आपल्या पक्षात आपली एकाधिकारशाही सिद्ध करण्यासाठी करत होते. त्यासाठी भाजपा हा देशात एकमेव पक्ष असणार अशा पद्धतीची आरोळी ते अधूनमधून ठोकतच होते. भाजपाच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना भाजपाची ही प्रगती वाटत होती. मोदी शहांना त्यांच्या विचारसरणीचा गौरव वाटत होता.

या विचारधारेचा निकाल जनतेने या निवडणुकीत दिला आहे. 'व्यक्तीपेक्षा पक्ष मोठा आहे' या सिद्धांताचा भाजपला विसर पडला होता. यानिमित्ताने आता हा विचार करण्याची गरज आहे. मोदींनी २०१४, २०१९ मध्ये भाजपाचे बहुमत असताना सत्ता हाकली होती. आता घटक पक्षांच्या कुबड्या त्यांना घ्याव्या लागणार. ज्या चंद्राबाबू नायडूंवर ते अवलंबून आहेत. यांनी राजकारण करताना आपल्या आजुबाजूच्या कोणालाही सत्तेपुढे मोजले नाही. स्वतःच्या सासऱ्यांना सुद्धा नाही त्यांनी आपल्या राज्यात भाजपाबरोबर संगठन केले ते अनिच्छेनेच मनापासून तर नाहीच. त्यांना इडी, सीबीआय यांचा धाक दाखवलेला आहेच. ते मोदी पंतप्रधान होण्यासाठी खरंच पाठिंबा देतील? याची शक्यता विचारात घेण्याची गरज आहे. एकीकडे नितीशकुमार आघाडीतील अजून एक प्रबळ साथीदार, नितेशकुमारांनी आत बाहेर आणि डोंगर की पाणी हा खेळ आतापर्यंत दोन वेळा केला आहे. निकालाच्या दरम्यान शरद पवारांना नितेश कुमारांनी फोन केल्याची बातमी सुद्धा ऐकायला मिळाली. त्यांनी फोन खरंच केला का? त्यांचे बोलणे काय झाले असेल, याचा तपशील काय असेल तो असेल पण नितेशकुमारांची राजकीय महत्वाकांक्षा पंतप्रधान होण्याची आहे. हे काही लपून राहिलेले नाही. अशावेळी नितेशकुमार मोदींच्या मंत्रीमंडळात काम करून शहा आणि मोदी यांच्या एकाधिकारशाहीत काय करतील? शंका निर्माण होण्याचे निश्चित कारण येथे आहे. विरोधात राहून एकत्र 'इंडिया'चा प्रयोग यशस्वी करून संख्याबळ तुलनात्मक स्तरावर आणणाऱ्यांकडून सत्ता स्थापन होणार नाही कशावरून? भाजपाला महायुतीचे सरकार स्थापन करायचे असेल तर एकाधिकारशाही, राजकीय दहशतवाद निर्माण करणाऱ्यांना सोडून आम्ही सत्तेत सहभागी होऊ असा प्रश्नात कदाचित घटक पक्षांच्या साथीदारांकडून दिला जाऊ शकतो.

अगदीच स्पष्टच बोलायचे तर मोदी शहा सोडून पंतप्रधान भाजपचाच असेल तर आम्ही भाजपाबरोबर आहोत हा प्रस्ताव घटक पक्षांनी दिला तर? याचाच अर्थ हा आहे, ज्या गॅरेंटीने ही निवडणूक लढवली आहे. त्यांनी स्वतःहून सन्मानाने बाजूला व्हावे. कारण आघाडीचे महायुतीचे सरकार चालवण्याचा अनुभव आपल्याकडे नाही. एकाधिकारशाही चालणार नाही. अशा प्राप्त परिस्थितीत नितीन गडकरींसारखा राजकारणाची साधनसुविधा सांभाळणारा संविधान आणि संगठन सांभाळणारा सामाजिक जाणिवेने, खंबीरपणे सरकार चालवू शकतो. अशा पद्धतीचे विचार प्रकटन अनेकजण व्यक्त करताना दिसत आहेत. अर्थातच भाजपसारखा विचार प्रगल्भ पक्षात विचार होतच असेल. या निवडणुकांचा परिणाम देशभरात जो काही होणार आहे तो होणारच आहे. लाखो मोदी भक्तांना त्याचा धक्का बसला आहे. पण मोदीविरोधक करोडोंच्या संख्येत आहेत. याची माहितीसुद्धा आता समोर प्रसिद्ध होऊन आली आहे. महाराष्ट्रात येऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकांवर ही निवडणूक इशारा देणारी आहे. शिल्लक पक्ष अशी हेटाळणी शरद पवारांची करणाऱ्या आणि नकली सेना म्हणून उद्धव ठाकरेंना हिणवणाऱ्या हिणकस वृत्तीला लोकांनी काय कौल दिला आहे त्याचा विचार करायला हवा. साम्राज्य विस्तारासाठी वाट्टेल ते करणारे इतिहासात अनेक होते. ते काळाच्या पडद्याआड गेले. पक्ष विस्ताराच्या नावाखाली तोडफोड पळवापळवी, इडीची काडी लावणारी पाशवी वृत्ती आणि भ्रष्टाचारी म्हणून सिद्ध झालेल्या, किंबहुना स्वतःच भ्रष्टाचारी लोकांना पक्ष विस्ताराच्या नावाखाली आपल्यात सामावून घेण्याचा विक्रम मनोवृत्तीला देशातल्या जनतेने धडा शिकवला आहे.

आत्मविश्वासाने राजकीय घोडदौड करणाऱ्या पक्षाचा व्यक्तीकेंद्रीत राज्यकर्त्यांमुळे ऱ्हास होणे क्लेशदायक होऊ शकते. या देशात स्थिर सरकार असायला हवे. प्रगतीसाठी विकासासाठी आवश्यक आहे. हे अगदी खरं आहे. जनतेला सुद्धा ते हवे आहे. म्हणून २०१४ आणि २०१९ मध्ये जनतेने कौल दिला होता. पण या दिलेला कौल एकाधिकारशाहीत, झुंडशाहीत परावृत्तीत झाला आणि तेथेच जनतेला ही निवडणूक हातात घ्यावी लागली. देशात जे सरकार स्थापन होईल ती जनता जनार्दनाची काळजी घेईल. मूठभर उद्योगपतींसाठी काम न करता जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी काम करेल याची अपेक्षा आणि प्रार्थना करावी लागेल. महाविकास आघाडीचे सरकार येवो अथवा महायुतीचे परंतु जो कोणी देशाचे नेतृत्व करेल ते मात्र जनतेचे विचार करणारे. जनतेच्या आचार विचारासाठी पर्वा करणारे असो! एवढेच आपण चिंतन करायला हवे ! **

# तयारी पहिल्या पावसाच्या आगमनाची



धनंजय शेट्ये

वैशाख वणवा अंगाची लाही लाही करत होता. अंगावरुन घामाच्या धारा वाहू लागल्या होत्या.कडक उन्हाळी वातावरणातील सर्व प्राणीमात्रांची असहाय्यता जाणवत होती. खेडोपाडीच्या विहिरी तलावं यांचे तळ दिसू लागले होते. शेतकरी हवालदिल झाले होते. आता फक्त सगळीकडे पावसाच्या आगमनाचे वेध लागले होते. शेतकरी राजा ढगांकडे डोळे लावून पावसाची आतुरतेने वाट पाहत होता. कधी एकदा पाऊस पडतो आणि धरणीमाता सुजलाम सुफलाम होते. याची जो तो वाट पाहत होते.कोकणी माणसं झाडावेलींवरील पानाफुलांवरुन पाऊस कधी येणार याचा अंदाज बांधत होता.

'शेवरा' नावाची वनस्पती बहरली की, आठ ते दहा दिवसांत पावसाचे आगमन होत असते. असा जुन्या जाणत्या शेतकरी बांधवांचा अंदाज असायचा.पावसाच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू झाली होती. शेतजमिनीची जाळभाज करुन काकडी, चिबूड, भोपळा, पडवळ, दोडकी यांसारख्या बी-बियाणांची लागवड करतानाची धावपळ काही वेगळीच असायची. नळे, कौले परतून वाळलेला, अडकलेला पालापाचोळा साफ करुन घरांच्या छप्पराच्या चारी बाजूंनी झडी बांधली गेली होती. नारळाच्या झाडांच्या विणलेल्या झावळांपासून कुड बनविला होता. पावसाळी हंगामात आवश्यक असणारा जळणफाटा, लाकडे, शेणी ,

नारळाच्या सोललेल्या भागांच्या सोढणे- कीशा चुलीत आग पेटविण्यासाठी जपून ठेवल्या जायच्या. विसवलेले 'इरले', दशा विनलेली घोंगडी यांची डागडुजी करुन शेतात वापरासाठी तयार करून होतं. ठेवणीचा कांदा, मिठाच्या फरी (पोते) घेऊन ओल येऊ नये, म्हणून मीठ ठेवण्याची जागा ओलमुक्त करुन ठेवली होती.गुरांसाठी दररोजच्या पाण्यात मीठ टाकावे लागते ती एक आणखी मिठाची फरी घेऊन ठेवाव लागते. वाळवण खळ्यात सुकत होती. कैरीची मीठ लावलेल्या फोडी,फणसाचे गरे,आंब्याचे साठे, सुके मासे, जवळा, कर्दी, वाळवलेले मासे हे अगदी आठ- दहा दिवस कडक उन्हाचा तडाखा घेऊन ठेवणीसाठी सज्ज झाले होते. आता फक्त वरुणराजाची वाट पाहत सारा आसमंत चिंताक्रांत दिसत होता. ओढ्यानाल्यातले बेडूक, खेकडे प्रवासाला निघण्याच्या तयारीत होते. शाळकरी मुलांची रेनकोट, छत्री,पावसाळी चपला, बॅग या गोष्टी घेण्यासाठी झुंबड उडाली होती.सायकलच्या रिंगला गंज पकडू नये म्हणून सायकल स्टोअरमध्ये मिळणारे ऑईल लावून घेतले होते.हे सर्व करताना पाऊ स देवच जाणवतं होता. वरुणराजा,मेघराजा असे का म्हटले जाते याचा खरा प्रत्यय येत असायचा. अलिकडच्या काळात ही पावसाची जय्यत तयारी आता खेडोपाडी दूरापास्त झाली आहे. पावसाळी वातावरणातील अडीअडचणी राहिल्या नाहीत.त्यामुळे सामानाची बेगमी करुन ठेवण्यासाठीची गरजच शिल्लक राहिली नाही.पण खरा आनंद मात्र आपण कायमचा हरवून बसलो.आनंदी जीवन जगण्यासाठी पैसा लागतोच कुठे? जुन्या परंपरागत गोष्टी करण्यासाठीची धडपड खरा आनंद मिळवून देत असते.आजच्या पिढीला पावसाच्या आगमनाची जय्यत तयारी काय असते? हे कसे कळणार? व्यवहारीक जगात यंत्राच्या हातातले बाहुले बनलेल्या मानवाला जुन्या परंपरागत संस्कृतीचा वारसा जपता येत नाही हेच तर खरे दुर्दैव आहे.आपण निसर्गाच्या सान्निध्यात निसर्गाच्या सहकार्याने उन्नती करुन घेतली पाहिजे. निसर्ग आहे म्हणून आपले जीवन आहे.पण मानव निसर्गावर अतिक्रमण करून आपलाच घात करीत चालला आहे.पावसाला देवता का म्हटले जाते याचे तरी भान असायला नको का? एक वर्ष जरी हा पाऊस पडला नाही शहरात पाणीपुरवठा करणारी तलावे भरली नाहीत तर पिण्याच्या पाण्यासाठीसुध्दा पाणी मिळणार नाही.शहराला प्रतिदिनी लाखो,करोडो लिटर जे पाणी लागते तेच उपलब्ध नसेल तर शहरं ओस पडणार नाहीत का? 'पाणी हेच जीवन आहे आणि पाणी देणारा तो वरूणदेव!' दरवर्षी सजीवसृष्टीला जगवायला न चुकता पाऊस हजेरी लावतोय. निसर्ग औदार्याने भरभरुन दान करत असतो पण मानव निष्काळजीपणा गैरवापर करून निर्सगाच्या उरावर विराजमान व्हायला पाहत आहे.

निसर्गाच्या औदार्याला सीमा नाही आणि माणसांच्या निष्काळजीपणाही!!!

**



# योगी पावन मनाचा





जावे संतांच्या गावा!

अनुराधा म्हात्रे

**श्रीस्वामी स्वरूपानंद (पावस)**

**भाग २**

श्रीस्वामी स्वरूपानंद तथा पूर्वाश्रमीचे रामचंद्र गोडबोले हे त्यावेळी पुण्यात शिकत होते. ते पदवी परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी सन १९३४ साली पुण्याहून पावसला आले. पुण्यात राहून खर्च वाढवण्यापेक्षा पावसला घरी जाऊन अभ्यास करावा आणि नंतर पुण्यात जाऊन पदवी परीक्षा द्यावी; असा विचार त्यांनी केला होता पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते! श्रीस्वामी पावसला आले पण परीक्षा देण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी पुन्हा पुण्यात कधीच गेले नाहीत!

पावसला आल्यावर स्वामी आजारी पडले. आजार विकोपाला गेला.या जीवघेण्या दुखण्याशी सतत सहा महिने ते झगडत होते. या आजारपणात त्यांनी मृत्यूचे जवळून दर्शन घेतले. स्वतः स्वामींनीच त्यांच्या काव्यात लिहून ठेवले आहे, अठराशे छपन्न शताब्दी, मृत्यू पावलो आम्ही।। त्यातून बरे होणे हा त्यांचा पुनर्जन्म होता. आजारपणामुळे त्यांच्या जीवनाला संपूर्णपणे नवे वळण लागले. त्यांना कायमची शारीरिक दुर्बलता प्राप्त झाली. चालणे, फिरणे यावर मर्यादा आल्या. पण याच आजारपणाने त्यांना एक सिद्ध योगी म्हणून पुनर्जन्म दिला.

वास्तविक साधुत्वाची बीजे त्यांच्यामध्ये आधीच रुजली होती. आजाराच्या आघाताने त्यांचा पूर्ण विकास झाला इतकेच! श्रीस्वामींना ऐन तारुण्यातच गुरूकृपेची तळमळ लागली होती. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी त्यांना गणेशनाथ उर्फ बाबा महाराज वैद्य या नाथपंथीय सद्गुरूंकडून अनुग्रह लाभला. अनुग्रह झाल्या दिवसापासूनच स्वामी अत्यंत तळमळीने आणि चिकाटीने साधना करत असतं.

अनुग्रह लाभल्यानंतर स्वामींना अतिशय समाधान वाटले व आनंद झाला, मात्र त्यांची जिज्ञासू वृत्ती कायम होती. त्यांनी बाबा महाराजांना निर्भीडपणे पण अत्यंत नम्रतेने विचारले, 'सद्गुरूंची कृपा झाली की, पूर्णता प्राप्त होते पण मला असा अनुभव आला नाही. असे का व्हावे?' स्वामींचा प्रश्न ऐकून महाराजांना आनंद झाला. असा रोकडा सवाल करणारा शिष्य त्यांना प्रथमच लाभला होता. महाराज म्हणाले, आपण दुधाला विरझण लावतो. विरझण लावल्यावर त्याचे लगेच दही होते का? पण ते दूधही राहत नाही. जेवायला बसल्यावर पहिल्याच घासात पोट भरत नाही! अनुग्रह लाभल्यानंतर साधना करतच हळूहळू पूर्णत्वाकडे जायचे असते हा बोध स्वामींनी त्यांतून घेतला. त्या दिवसापासून सद्गुरूंनी सांगितलेली साधना निष्ठेने आणि प्रेमाने करणे ही गोष्ट जीवन व्रत म्हणून त्यांनी स्वीकारली. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतल्याबद्दल त्यांना तुरुंगवास घडला होता पण तुरुंगात सुद्धा स्वामी अतिशय तळमळीने व नियमितपणे ध्यानधारणा करत असतं.

स्वामी स्वरूपानंदांनी लौकिक अर्थाने संन्यासाची भगवी वस्त्रे परिधान केली नाहीत पण भगवद्गीतेने सांगितलेला 'नित्यसंन्यासी' ते झाले. कुणाचाही द्वेष नाही, कशाचीही अपेक्षा नाही, सदैव आत्मसुखांत मग्न असावे व लोकांनाही या श्रेष्ठ सुखाचा मार्ग दाखवावा ; हेच कार्य त्यांनी स्वीकारले. परमेश्वर प्राप्तीसाठी घरदार सोडून जंगलात जाण्याची आवश्यकता नाही. संसारात राहूनही परमेश्वराची प्राप्ती करता येते असा उपदेश त्यांनी सर्वसामान्य लोकांना केला. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ भारतीय संस्कृती मानलेले आहेत. अर्थ व काम हे धर्म आणि मोक्षाच्या चौकटीत राहून उपभोगाचे असतात. श्रीस्वामी सांगतात, योग्य व्यवहाराने मिळवलेले धन हे जीवास शांती देते. विवेकाने भोगलेला काम जीवाला विश्राम देतो. संयमी जीवन हेच धर्माचरण आहे, असा धर्माचा अर्थ त्यांनी सांगितला. स्वामींचा दृष्टिकोन विशाल होता विश्वबंधुत्वाची कल्पना त्यांच्या मनात प्रभावी होती. अखिल मानव जातीचे कल्याण करणे, हे त्यांचे ध्येय होते.स्वामी स्वरूपानंदांचे वागणे, बोलणे हे वरकरणी एखाद्या सर्वसामान्य माणसा सारखेच होते. अध्यात्मिक गुरुला भेटावे या इच्छेने आलेल्या नवख्या माणसाला याचे आश्चर्य वाटायचे, पण शुभ्र वस्त्रांकित, प्रसन्न चेहऱ्याच्या, मृदू आणि मधुर बोलणाऱ्या या योगीराजाच्या दर्शनाने आणि उपदेशाने त्याचे समाधान होत असे! स्वामींनी आपल्या गुरुपणाचे कधीच प्रदर्शन केले नाही. शिष्यांकडून पाद्यपूजा, पादसंवाहन करणे, पूजा करून घेणे वगैरे गोष्टी त्यांनी कटाक्षाने टाळल्या. ते म्हणत, 'अंतरीच्या शुद्ध भावाने हे सर्व साधते. सेवा याचा अर्थ केवळ शारीरिक सेवा असाच नव्हे'. गुरुसेवा किती उच्च पातळीवर नेता येते, हे स्वामींनी आपल्या स्वतःच्या आचरणातून दाखवून दिले. त्यांचे सद्गुरू बाबा महाराज हे ज्ञानेश्वरीची हस्तलिखित पोथीच वाचत असतं. त्यांच्या वाचनात असलेली प्रत अतिशय जीर्ण झाली होती. स्वामींनी त्यांच्यासाठी ज्ञानेश्वरी लिहिण्याचे कार्य हाती घेतले. सुंदर स्वच्छ अक्षरात, शुद्धलेखनाची एकही चूक नसलेली ज्ञानेश्वरची प्रत त्यांनी सद्गुरूंना अर्पण केली; यावरून स्वामींची गुरुभक्ती आणि कामावरील निष्ठा दिसून येते.

स्वामी स्वरूपानंद यांनी कधीच मोठे चमत्कार केले नाहीत. कारण आध्यात्मिक साधनेमध्ये वृत्तींत बदल होणे, वृत्ती पालटणे हाच खरा चमत्कार आहे. स्वामी म्हणत, 'खरा परमार्थ, प्राप्त परिस्थिती सुखाने भोगण्याची कला शिकवतो! स्वतः स्वामी याचे उत्तम उदाहरण आहेत. स्वातंत्र्यलढा, समाज सुधारणा आणि अध्यात्मिक साधना हे स्वामींच्या व्यक्तिमत्त्वातले महत्त्वाचे पैलू होते. आजारपणामुळे पहिले दोन आपोआपच संपुष्टात आले पण त्याबद्दल तक्रार किंवा कुरकुर त्यांनी कधीही केली नाही. उलट खडतर साधना करून त्यांनी आत्मज्ञान प्राप्त केले. ते कायम आत्मानंदात मग्न असत. ते सही सुद्धा 'आपला आत्मतृप्त' अशी करत.हाच परमानंद सर्व प्रापंचिक माणसांना मिळावा ही त्यांची तळमळ होतो. आपल्या दुर्बल प्रकृतीची तमा न बाळगता ते आयुष्यभर त्यासाठी कार्यरत राहिले. सामान्य माणसांना दैनंदिन अडचणींवर मात करून अध्यात्मिक साधना करता यावी यासाठी ते सतत मार्गदर्शन करत. ते म्हणत, 'आपण अलिप्त राहून सर्वांचेच कल्याण इच्छावे, कोणाबद्दल राग, द्वेष किंवा तिरस्कार बाळगू नये. दुसऱ्याच्या दोषाचे चिंतन किंचितही करू नये'. सामान्य माणसाला व्यवहारात टीका टिप्पणीचे धनी व्हावे लागते त्यामुळे कार्य करताना त्याचे मन नाराज होते. याबाबतीत एका साधकाला उपदेश करताना स्वामींनी सांगितले होते, 'आपले वागणे शक्यतो कोणास टीका करण्यास वाव मिळू नये असेच ठेवावे. त्यातूनही कोणी टीका केली तर तीही शांत चित्ताने सहन करण्याची ताकद असावी. ते ही आपलेच आहेत असे समजून त्यांच्याबद्दल नेहमी सदिच्छाच बाळगावी'. स्वामी स्वरूपानंदांच्या विशाल अंतकरणाचे यातून दर्शन होते. अद्वेष्टा सर्वभूतानाम्' या भगवद्गीतेत सांगितलेल्या गुणाची प्रचिती येते.

स्वामी स्वरूपानंद म्हणजे अनेक दैवी सद्गुणांनी युक्त असलेले करुणेचा सागर होते; असे म्हणणे अधिक यथार्थ ठरेल! **

# नातं विश्वासाचं असावं?

**विश्वासाला तडा दिला , विश्वासघात केला असे शब्द प्रयोग करणे सोपे असलेतरी ज्याच्यावर ओढवतो तोच विश्वास शब्दाचे गांभीर्य अधिक समजू शकतो. कारण विश्वास या शब्दातच श्वास दडलेला आहे. कोणतेही नाते विश्वासावर अवलंबून असते नव्हे टिकून असते. प्रत्येक नात्याचा जीव असतो तो म्हणजे विश्वास. कोणतंही नातं मजबूत करण्यासाठी विश्वास महत्त्वाचा आहे. नात्यातून विश्वास गेला तर नात्याला तडा जातो आणि ही कसर कधीच भरून काढता येत नाही. हा विश्वास जपण्यासाठी सद्सदविवेक बुद्धीने विचार करायला हवा.**



अंकुश शिंगाडे

विश्वास ही महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. विश्वास जर नसेल तर मोठमोठे अपराध घडून येतात. म्हणूनच विश्वास हवा. विश्वासाचं एक उदाहरण देतो. कथा फेसबुकवरील आहे. उदाहरण पती पत्नीचं आहे. एका घरी त्याची पत्नी कामावर गेली की एक स्त्री त्याच्या घरी येत असे. त्याचं कारण होतं त्याचं आजारीपण. तो आजार फक्त त्याच व्यक्तीला माहीत होता. शिवाय ती त्याला काही औषधी देवून लवकरच निघून जात असे. तसं पाहिल्यास तिचं त्याच्यासोबत लपडं बिफडं असं काहीच नव्हतं.

तिला गंभीर आजार माहीत होता व ती त्याची फारच काळजी घेत असे एक डॉक्टर म्हणून. ती डॉक्टर आणि तो पेशंट एवढंच त्यांचं नातं होतं. तसाच तोही तो आजार आपल्या पत्नीला सांगू शकत नव्हता. कारण त्याला भीती वाटत होती की जर त्यानं तो आजार आपल्या पत्नीला सांगितला तर तो ती त्याला चक्क सोडून देईल. मात्र हे किती दिवस लपणार.

ती त्याची पत्नी गेल्यावर रोजच त्याचे घरी येते हे वस्तीतील आजुबाजूच्या लोकांना माहीत होतं. परंतु ती नेमकी त्याच्या घरी का येते. हे मात्र लोकांना माहीत नव्हतं. शेवटी त्याच लोकांनी तिला त्या गोष्टीची माहीती हवी म्हणून तिला सांगितलं व ते माहीत होताच तिनं त्यावर पाळत ठेवली व तिला आपल्या गेल्यानंतर कोणीतरी महिला आपल्या पश्चात या घरी येते. असा संशयच नाही तर ती वास्तविकता वाटली. तिनं त्या प्रकरणाची शहानिशा न करता मनातल्या मनात संशय बांधला आणि ठरवलं, आपण अशा लबाड माणसाजवळ राहायचं नाही. मग तीच त्याला सोडून गेली व तिनं,त्याला लागलीच घटस्फोटाची नोटीस पाठवली शिवाय खावटीही व ती केसही जिंकली. तिला खावटी मंजूर झाली. तसा तो त्याच्या जीवनातील शेवटचाच दिवस होता. तो काही जास्त जगणार नव्हता.

त्याची पत्नी जशी केस जिंकली आणि त्याचेजवळ आली. तसा तिनं एक कागद त्याचेसमोर केला आणि म्हणाली,''तू व्याभीचारी निघाला नसतास, तर मी तुझ्यावर केसही टाकली नसती आणि खावटीही मागीतली नसती.''

ते तिचं बोलणं. त्यावर विचार न करता व न बोलता तो चूप बसला. तशी तीच म्हणाली,

''आता बोल ना. आता का बोबडी वळली. आता बोल ना, देणार की नाही खावटी?''


ते तिचे शब्द. ते तिचे शब्द ऐकताच त्यानं एक फोन लावला. त्या एका फोनवर वकील व डॉक्टर सोबतच आले व वकीलानं एका कागदावर त्याची स्वाक्षरी घेतली. ज्यात लिहिलं होतं की मी काही जास्त दिवसाचा पाहुणा नसल्यानं ही संपूर्ण मालमत्ता आजपासून तुझीच असून या संपूर्ण मालमत्तेचा यथायोग्य वापर कर. त्यानंतर त्यानं वकीलाकरवी स्वतःचा स्वाक्षरी केलेला कागद तिच्याजवळ दिला व सोबत चावीही. त्यानंतर तिनं कागद वाचला. त्या कागदावर लिहिलेला मजकूर वाचला आणि विचारलं की आपण खरोखरच आजारी आहात का? त्यावर तो म्हणाला, ''मी मी खरोखरच आजारी आहे व मी दोन चार दिवसानं मरणारच आहे. मग ही मालमत्ता मी माझ्या नावावर ठेवून काय करु? ही मालमत्ता तुझीच आहे व तू या मालमत्तेचा योग्य सांभाळ कर.''

''मग ती कोण? जी दररोज आपल्या घरी येत होती.''

ती डॉक्टर आहे. ती रोज मलाच तपासायला येत होती. मग ती लपूनछपून का येत होती तुम्हाला तपासायला? मीच सांगितलं होतं तिला की, ही गोष्ट तुला माहीत होवू नये म्हणून.

''का? काय ती गोष्ट मला माहीत केली नाही?''

''मला वाटत होतं की तू मला सोडून जाशील हा आजार माहीत झाल्यावर आणि शेवटी तू सोडून गेलीसच. आता हे सारं तुझंच आहे. मी फक्त दोन चार दिवसाचाच सोबती आहे. ती घटना....... ती घटना हृदयाला स्पर्श करणारी आहे. अविश्वासाचं मूर्तीमंत उदाहरण आहे. कधीकधी आपण जे डोळ्यानं पाहतोय ना. तेही वास्तविकपणे खरं नसतंच. शिवाजी महाराजांवर संबंध मावळ्यांचा विश्वास होता व मावळ्यांचा शिवरायांवर. काही लोकं म्हणतात की त्यात विश्वास कसा काय? परंतु त्यात विश्वास नाही तर काय. अहो, शिवा काशिदनं अगदी विश्वास ठेवून शिवराय बनायचं ठरवलं व तो बलिदानास तयार झाला. अहो, मदारी मेहतरनं विश्वास करुन आग्र्यातून महाराजांचे पलायन केले. या दोन्ही घटनेत समजा मदारी मेहतरनं शिवरायांसोबत दगाबाजी केली असती तर चित्र काहीसं वेगळं असतं. बादशाहानं शिवाजी महाराजांना पुन्हा पकडलं असतं व शिवरायांची दगाबाजी केली म्हणून संभाजीसारखी मानच कापून टाकली असती आणि मदारी मेहतरला दरबारात मानाची जागा दिली असती. बादशाहात ती ताकद होती की त्या बादशाहानं गोविंद सिंहाचे गुरु वडील गुरु तेगबहाद्दूर सिंह यांचीही हत्या केली होती. परंतु बादशाहा समजून होता की जर शिवाजी महाराजांची हत्या त्यानं केली तर अख्खा मुस्लीम समाज चिडेल व तो औरंगजेब बादशाहाचं शासनच उलथून टाकेल. म्हणूनच पन्हाळा असो की आग्रा, शिवाजी महाराज कैदेत सापडूनही त्यांची हत्या त्याला करता आली नाही. याला विश्वासच म्हणता येईल मदारी मेहतर आणि शिवा काशिदचा आणि त्याचबरोबर विश्वास होता शिवरायांचा मुस्लीम समाजावर. म्हणूनच संपूर्ण आरमारांचा प्रमुख दौलतखानाला बनवलं व संपूर्ण तोफखान्याचा प्रमुख इब्राहीम खानाला बनवलं आणि आपले काही अंगरक्षकही मुस्लीमच बनवले होते. विश्वास....... विश्वास फार मोठी गोष्ट असते. याच विश्वासासाठी स्वतःचा हातही तोडला होता जीवा महालानं आणि याच विश्वासातून पावनखिंडही लढवली होती बाजीप्रभूंनी. एवढंच नाही तर रायबाचा विवाह मागे टाकून कोंढाणा सर करायला गेला होता तानाजी आणि स्वतःच्या जीवावर मरण ओढवून घेतलं. विश्वासाबाबत कितीतरी उदाहरणं देता येतील. विश्वास आहे म्हणूनच जग टिकून आहे. नाहीतर देशातील लोकांची केव्हाचीच खांडोळी झाली असती. कारण जिथं विश्वास तुटतो. तिथं भांडणं व वाद उत्पन्न होत असतात. म्हणूनच सर्वांनी विश्वास करायला शिकावं. विश्वासघात करु नये. कारण विश्वासातून पवित्र नातं निर्माण होवू शकतं. माणसं जोडता येवू शकतात आणि विश्वासघातातून. विश्वासघातातून नाती तुटतात. माणसं दुरावली जातात आणि जे न व्हायचं ते होतं. जीवनाचा सत्यानाश होतो आणि तेवढाच संसाराचा बट्ट्याबोळही.



**

## वाचनीय, प्रेरक आणि संग्राह्य

# पोलीस 'मन'

पुस्तक परीक्षण

प्रा. शाम जोगळेकर

मो. ९२७३३४३१७७

पोलीस 'मन', हे अजित देशमुख यांचे अनुभव कथन संवेदना प्रकाशनने अतिशय देखण्या स्वरूपात प्रकाशित केले आहे. धनश्री लेले यांची वेधक, सविस्तर प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. पोलीस दलातील प्रदीर्घ कारकिर्दीत, प्रामुख्याने गुन्हे अन्वेषण विभागात काम करताना, विविध गुन्ह्यांचा तपास करताना आलेल्या अनुभवांची ओळख या पुस्तकातून वाचकांना होते. अजित देशमुख यांचे सविस्तर 'मनोगत' या पुस्तक लेखनामधील त्यांची भूमिका उत्तम प्रकारे स्पष्ट करते. त्यांच्या महत्त्वकांक्षेनुसार सबइन्स्पेक्टरच्या प्रशिक्षणासाठी त्यांची निवड झाली. नाशिक येथील प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर १९७७ ते फेब्रुवारी,२०१०, निवृत्तीपर्यंत त्यांची बहुतांश सेवा मुंबईत गुन्हे अन्वेषण शाखेत झाली. त्यामुळे त्यांना अनेक महत्त्वाच्या आणि गंभीर गुन्ह्यांचा तपास करण्याची संधी लाभली. त्यांच्या उत्तम कार्यामुळे त्यांना २००५ मध्ये राष्ट्रपतींचे, ''प्रशंसनीय सेवेबद्दलचे पोलीस पदक''७ जाहीर झाले. या पुस्तकाचे रंगीत, साधेसेच पण सूचक मुखपृष्ठ ऋषाल कराळे यांचे आहे. या पुस्तकात लहान-मोठे, एकूण बावीस लेख समाविष्ट आहेत.




कुर्ला पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना सर्पदंश होऊन मृत्यू पावलेल्या बावीस वर्षांच्या तरुणाची कथा, गरिबीला अश्रूंचे वावडे, या पहिल्या कथेत वाचावयास मिळते. कुर्ल्यातील एका तबेल्यात काम करणाऱ्या आणि तेथेच राहणाऱ्या, पाच-सहा, अन्य राज्यातील कामगारांपैकी एकाला माळ्यावरील गवताच्या भाऱ्याखालील विषारी साप चावल्याने मृत्यू होतो. त्या मुलाच्या वडिलांना हे सारे दुःख विसरून मालक सांगेल ते काम कोरड्या डोळ्यांनी करावे लागत असल्याचे पाहून लेखकाप्रमाणेच वाचकही दुःखी होतो. लहान मूल गर्दीत हरवल्याने दुखी होणारी आई आणि नंतर पोलिसांच्या मदतीमुळे, मूल सापडल्याने बदललेले चित्र हे ''उत्कट'' कथेत वाचता येते. लग्नाचा पोरखेळ मांडलेल्या तरुणांच्या गटाला आणि बरोबर आलेल्या एका नवरीची १९९७ मध्ये कशी सुटका केली, हे लेखकाने ''सुटका'' मध्ये उत्तम प्रकारे मांडले आहे. अपरिपक्वतेमुळे बस स्टॉपवर नेहमी भेटणाऱ्या मुलाबरोबर, मुलगी लग्नाला तयार होते. परंतु पुढे काय होईल याचा विचार त्यांनी केलेला नसतो. मात्र ही जबाबदारी पोलिसांना स्वीकारावी लागते. 'विकृत' या कथेत मुंबईत राहणारे एक जोडपे, दहा-अकरा वर्षांच्या, गावाकडील नात्यातील मुलीवर कसा अन्याय करते, याची कल्पना येते. त्यानंतर सुटका झालेली, ती विवाहित मुलगी आणि तिथे कुटुंबीय अजित यांना त्यामुळेच वडिलांचा दर्जा देतात.

''ड्युटी ऑफिसर'' हा लेख पोलीस विभागातील कामाच्या समग्र स्वरूपाची माहिती देतो. वाढत्या जबाबदाऱ्यांमुळे आणि प्रचंड कामामुळे घरच्यांकडे पोलीस अधिकाऱ्याला कसे लक्ष देता येत नाही, याची जाणीव होते. पोलीस विभागातील या दैनंदिन कामाची सामान्य नागरिकांना फारशी कल्पनाही नसते. ''बंदर'' मधील गुन्हेगार काण्या इब्राहिमची जीवन कहाणी हृदयस्पर्शी झाली आहे. त्याने स्वतः भाकीत केल्याप्रमाणे, फुटपाथवरच एका दुकानाच्या फळीवर बेवारस स्थितीत त्याचे निधन होते. अशा प्रकारच्या लक्षावधींचा तो कदाचित प्रतिनिधीही असू शकेल. 'शिक्षा' मध्ये युवकांनी मित्रांच्या संगतीत राहताना कोणती काळजी घ्यावी, हे उत्तम प्रकारे सोदाहरण स्पष्ट केले आहे. खळगी, या लेखात झोपडपट्टीतील गुन्हेगारी शोधून काढताना आलेले विदारक अनुभव शब्दबद्ध केले आहेत. पोटाची खळगी भरणे ही दैनंदिन गरज भागेल, याचीही भ्रांत असणाऱ्या मुंबईतील अनेकांचे दर्शन यामधून होते. गोळी, या लेखात फेब्रुवारी,१९९० मध्ये एका सधन वृद्ध दाम्पत्याला त्यांच्या घरगड्याने साथीदारांच्या मदतीने लुटल्याची हकिगत आणि त्या गुन्हेगारांचा शोध अन्य राज्यांत घेऊन, त्यांना झालेल्या शिक्षेपर्यंतचा प्रवास वाचावयास मिळतो. घरगडी नेमताना नेहमीप्रमाणे त्याचा पूर्ण पत्ता, नाव इ. तक्रारदारांना माहीत नव्हतेच. मुख्य आरोपी आजारी असताना त्याला पोलीस अधिकारी सहानुभूती दर्शवून मदत करतात. त्यामुळे शेवटी शिक्षा होऊनही तो गुन्हेगार कृतज्ञतेने पोलिसांना, जेलमध्ये जाताना वंदन करतो. रामायणाचे महाभारत कसे घडले हे ''सीताहरण'' या लेखात वाचावयास मिळते. गुन्हे सोडवताना येणारे हे काही रंजक अनुभव! ''बलात्कार'' या लेखात आईच मुलीवर बलात्कार झाल्याची खोटी तक्रार देते. आईच्या हट्टामुळे, एका सालस, अभ्यासू मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त होते. केवळ अहंकारापोटी. ''सेवावृत्ती'' आणि ''अपना इंडिया'' हे लेख नितांत वाचनीय आहेत. ''हतबल''चे पाच भाग वाचनीय आणि मार्गदर्शक आहेत. पोलिसांसमोर येणारी प्रकरणे कशी असतात याची उत्तम कल्पना येते शिक्षित आणि सुशिक्षित, या लेखातून उच्चशिक्षित, श्रीमंत मुलगा आपल्या आई आणि अन्य भावंडांवर चोरीची फिर्याद देतो. शेवट वाचताना लेखाच्या यथार्थ शीर्षकाची जाणीव होते. मनमवाळ, हायुनुसभाईवरील लेख संपूर्णपणे वेगळा आहे. त्याद्वारे लेखकाचे व्यक्तिचित्र उत्तम प्रकारे मांडण्याचे कौशल्य स्पष्ट होते. शेवटच्या दोन दीर्घ लेखांतून पोलीस दलातील अधिकारी गुन्हे कौशल्याने कसे सोडवतात, याची उत्तम कल्पना येते. विदेशी आतंकवादी अब्बासबाबत शेवटी अजित लिहितात, ''माणसाने माणसावर केलेल्या अन्यायाविरोधात, माणसानेच माणसे मारण्यासाठी माणसाच्याच रूपातील तयार केलेल्या किलिंगमशीनसाठी माणूसनिर्मित धर्म, वंश, प्रांत, सत्तेचा लोभ हे वंगणाचे काम शतकानुशतके करतच आहेत.''

पुस्तकाचे शेवटी अजित देशमुख यांचा सचित्र, सविस्तर परिचय करून दिला आहे. हे पुस्तक म्हणजे आपल्या समाजाचे एक वेगळे चित्र आहे. अजित देशमुख यांनी आपल्या लेखन कौशल्याने ते वाचकांसमोर मांडले आहे. त्यामुळेच हे पुस्तक नितांत वाचनीय, प्रेरक आणि संग्राह्य झाले आहे. वेगळ्या अर्थाने ते समाजशिक्षणही करते आहे. **

**पुस्तकाचे नाव : पोलीस 'मन '**
**लेखक :अजित देशमुख ९८९२९४४००७**
**प्रकाशक : संवेदना प्रकाशन, पुणे-३३. प्रथम ावृत्ती : ४.२.२०२४**
**पृष्ठे :२०८. मूल्य : रु.३००/-**

# कीड रोग नियंत्रणाचे पारंपरिक उपाय

श्री. प्रमोद जाधव

शेतीसाठी रासायनिक कीटकनाशकांचा अवाजवी वापर केल्यास प्रदूषणासह मानव व पशुपक्षांना विविध प्रकारचे आजार होतात.काही दुष्परिणाम लगेच जाणवतात.यात उलटी, जुलाब, डोकेदुखी, चक्कर येणे, खाज येणे, सूज येणे अशी लक्षणे दिसतात.तर काही परिणाम हे दिर्घ कालीन व Slow Poisoning असतात. यामुळे कॅन्सर, जन्मदोष, प्रजनन क्षमतेवर परिणाम होणे, रोगप्रतिकारक क्षमता कमी होणे, अल्झायमर, लठ्ठपणा, ल्युकेमिया, पार्किन्सन असे रोग उदभवतात. कृषी क्षेत्रातील या प्रदूषणामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची काही ठळक व गंभीर उदाहरणे देत आहे.



पंजाब हे कृषी प्रधान राज्य आहे. येथे प्रदूषणामुळे विविध प्रकारचे गंभीर आजार होत आहेत. पंजाबमधील भटिंडा येथून कॅन्सर रुग्णांनी भरलेली एक ट्रेन बिकानेर येथील हॉस्पिटलला जाते. तिला कॅन्सर ट्रेन असे देखील म्हणतात. मीना नदी, पुणे जिल्ह्याच्या परिसरात प्रत्येक दहा कुटुंबांमागे एकाला कॅन्सरची बाधा होत आहे. याबाबत अलिकडच्या काळात सन २०२२ मध्ये या भागात सर्वेक्षण करण्यात आले. यात राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेमधील व इतर तज्ञ व्यक्तींनी सहभाग घेतला. तेथे कॅन्सर सारख्या गंभीर आजारास कारणीभूत ठरणाऱ्या रासायनिक पदार्थांचे उत्सर्जन करणारे कारखाने ५५ किमी च्या परिसरात नाहीत. तरी देखील तेथील कॅन्सर रुग्णांमध्ये होणारी वाढ लक्षणीय असून यामागे शेतीमधील प्रदूषणाचे विविध दुष्परिणाम हे एक कारण आहे. रासायनिक किटकनाशके पिकांवर फवारताना संबंधित शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याच्या देखील काही घटना यवतमाळ जिल्हा व इतरत्र घडलेल्या आहेत.

डीडीटी या रासायनिक किटकनाशकांचे दुष्परिणाम (Slow Poisoning) रिचेल कार्सन या लेखिकेने सायलेंट स्प्रिंग या पुस्तकातून सन १९६२ मध्ये जगासमोर आणले. त्यामुळे जनजागृती झाली. डीडीटीवर अमेरिकेत व काही काळानंतर भारतात बंदी आली.तसेच इतर किटकनाशकांवर वेळोवेळी बंदी घालण्यात आलेली आहे.अलीकडे म्हणजे सप्टेंबर २०२३ मध्ये केंद्र शासनाने तीन रासायनिक कीटकनाशके आणि एक बुरशीनाशक वर बंदी घातली आहे. पण अशी बंदी लागू होईस्तोवर शेतीचे व पर्यायाने निसर्ग, पर्यावरण आणि सजीवांचे अतोनात नुकसान होत आहे.

रासायनिक कीटकनाशकांचा मागील दीडशे वर्षात शोध लागला.पण कीटक व रोग हजारो वर्षांपासून आहेत. प्रदीर्घ काळापासून आपल्या पूर्वजांनी त्यावर सेंद्रिय उपाय शोधले आहेत. पण हे पारंपरिक ज्ञान आता लुप्त होऊ लागले आहे.

या समस्येवर मात करण्यासाठी सेंद्रिय किटकनाशके, विविध जैविक उपाय तसेच रोग प्रतिकारक जाती लावणे इत्यादी पर्याय उपलब्ध आहेत. सेंद्रिय कीटकनाशके ही वनस्पती व सेंद्रिय घटक पदार्थ यांच्यापासून बनवली जातात. ती विघटनशील असल्याने त्यांचे अवशेष उरत नाहीत.

भात हे भारतातील तसेच जगातील एक महत्वाचे तृण धान्य आहे. सध्या भात शेतीवर येणाऱ्या कीड व रोगांवर प्रामुख्याने सुमारे १० ते १५ प्रकारची रासायनिक किटकनाशके वापरली जातात. परंतु या रासायनिक किटकनाशकांच्या अवाजवी वापराचे बरेचसे दुष्परिणाम देखील आहेत. हे सर्व दुष्परिणाम टाळण्यासाठी सेंद्रिय कीटकनाशकांचा वापर करणे केव्हाही हिताचे ठरते. सध्या ८ ते १० प्रकारची सेंद्रीय किटकनाशके जास्त प्रचलीत आहेत. ही बाब लक्षात घेऊन भात शेतीसाठी तब्बल १११ विविध सेंद्रिय किटकनाशकांची माहिती मी दिर्घकाळ प्रयत्न करून प्राप्त केली आहे व ती शेतकऱ्यांना तसेच कृषी अभ्यासकांना विविध प्रसिद्धी माध्यमांद्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात अशा स्वरूपाची सेंद्रिय किटकनाशक यांची माहिती उपलब्ध होण्याची महाराष्ट्रात बहुधा पहिली वेळ आहे.

याबाबत महाराष्ट्रासह आसाम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, ओरिसा, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, झारखंड, बिहार, मध्यप्रदेश इत्यादी राज्यातील शेतकऱ्यांकडे पारंपारिक ज्ञान आहे. तथापि हे ज्ञान अधिकाधिक सर्वसामान्य शेतकऱ्यांना सहज उपलब्ध व्हावे यासाठी या ज्ञानाचे संकलन व सुसूत्रीकरण करून त्याद्वारे १११ सेंद्रिय कीडरोगनाशकांची माहिती सहज - सुलभ मराठी भाषेत मी तयार केली आहे.

या सेंद्रिय किडरोगनाशकांच्या निर्मितीसाठी एक किंवा अधिक वनस्पती व सेंद्रिय घटक पदार्थ वापरले जातात.शेतकरी आपल्या परिसरातील अशा वनस्पती ,पदार्थ यांचा वापर करून घरीच हि सेंद्रिय कीटकनाशके अत्यंत कमी खर्चात करू शकतात. यांचा वापर बीजप्रक्रिया, बियाणे लागवड, चिखलणी व रोपांची लावणी व नंतरच्या विविध स्थितीत करता येतो.मात्र प्रत्येक ठिकाणच्या स्थानिक परिस्थितीनुसार हे ज्ञान पूर्वजांनी विकसित केले आहे.याबाबत शेतकऱ्यांनी प्रयोग करून आपल्या शेतात उपयुक्त ठरते काय ते पहावे.

या १११ सेंद्रिय किटकनाशकांच्या शेतीमधील वापरामुळे आरोग्य व आर्थिकदृष्ट्या शेतकऱ्यांना विविध प्रकारचे फायदे होणार आहेत. तसेच रासायनिक किटकनाशकांचा अवाजवी वापर रोखण्यासाठी व त्यामुळे होणारे विविध प्रकारचे दुष्परिणाम टाळता येणार आहेत. या सेंद्रिय कीटकनाशकांच्या शेतीमधील वापराचा निसर्ग व पर्यावरणपूरक असा पर्याय नक्कीच फायदेशीर ठरणार आहे.

माझ्या आई-वडिलांचा दोन गंभीर आजाराने मृत्यू झाल्याने मी सेंद्रिय शेतीत विविध प्रकारचे संशोधनपर प्रयोग करण्यास सुरुवात केली. मी विविध प्रकारच्या ५२ गावरान बियाण्यांचे संकलन करून ती बियाणी ॲग्रीकार्ट सीड बँक, (डिगस, सिंधुदुर्ग ) यांचेकडे सुपूर्द केली आहेत.

**(कोकण कृषी विद्यापिठाचे नवे कुलगुरू डॉ. संजय भावे व प्रमोद जाधव यांची चर्चा)**

कोकण कृषी विद्यापिठाचे नवे कुलगुरू डॉ. संजय भावे यांची मी मध्यंतरी भेट घेऊन त्यांना या कृषीविषयक संशोधन कार्याची माहिती सादर केली. त्यावेळी डॉ. संजय भावे यांनी अभिनंदन करतानाच या १११ सेंद्रिय किडरोगनाशकांबाबत अधिकचे संशोधन करण्यात येईल असे आश्वासन दिले. तसेच संजय भुसकुटे (जन संपर्क अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ) व संजय पाटील ( बायफ संस्था) यांनीही कृषीक्षेत्रातील या कार्याबद्दल अभिनंदन केले.

खरेतर हे परंपरागत ज्ञान शेतकरी बांधव यांचेच आहे. ते सुसूत्रीत करून शेतकऱ्यांना परत देत आहे. त्यामुळे याचे व्यक्तिगत पातळीवर कोणतेही पेटंट मी किंवा अन्य व्यक्ती /कंपनी अशा कुणीही घेण्याचा प्रश्नच उदभवत नाही, असे मी स्पष्ट करत आहे. विविध वृतपत्र व कार्यक्रमाच्या माध्यमातून ही कृषी विषयक माहिती सर्वसामान्य शेतकरी, विदयार्थी व कृषी अभ्यासक यांना माझ्यातर्फे उपलब्ध करून दिली जाणार आहे.मात्र या माहितीचा वापर व प्रसार करताना माझ्या या लेखाचा उल्लेख करावा ही स्वाभाविक अट आहे. तसेच शेतकरी हितासाठी अन्य काही पिके, भाजीपाला व फळझाडांबाबत अशाच प्रकारे माहिती मिळवण्याचे काम मी सध्या करत आहे.

**(अ) बिज प्रक्रिया** - १. बोगनवेल रस - २०० ग्रॅम बोगनवेल पाने चेचून १ लीटर पाण्यात भिजवून रात्रभर ठेवावी. एक दिवसानंतर हे पाणी घ्यावे. त्यात पाच पट पाणी मिसळावे. या मिश्रणाने बिज प्रक्रिया करावी. यामुळे बुरशीजन्य रोगावर नियंत्रण मिळते.

२. वेखंड व गोमुत्र - पाणी ५५ अंश सेल्सिअस पर्यंत तापवावे. नंतर थंड होऊ द्यावे. या थंड पाण्यात वेखंड पावडर व गोमुत्र मिसळावे. यात बी टाकावे. जे बी तरंगेल ते काढून टाकावे. जड बी लागवडीसाठी वापरावे.

३. पुदीना रस- २०% पुदीना रसात भात बी बुडवून लावावे. यामुळे पानांवरील तपकिरी ठिपके (Brown leaf Spot) या रोगावर नियंत्रण मिळते.

४.गोमुत्र - १ लीटर गोमुत्रात ५ लिटर पाणी मिसळावे. भाताचे बी यात अर्धा तास भिजवावे. व सावलीत सुकवावे. याने बी वरील रोग नष्ट होण्यास मदत होते.

५.कडुलिंब पेंड, पाणी यांच्या मिश्रणात भात रोपे बूडवून लावल्यास मुळ कुज, सुत्रकृमी पासून बचाव होतो किंवा नांगरणीच्या वेळी निम पेंड मिसळावी.

६.गुळवेलचा वापर नैसर्गिक किटकनाशक म्हणून फिलीपाईन्स देशात करतात. भाताची लावणी करताना भाताची मुळे गुळवेलच्या रसात बुडवतात. भारतात एक हेकटर क्षेत्रातील लावणीसाठी १० ते १५ किलो गूळवेल वापरतात.

७.बी पेरल्यानंतर जमिनीवर हलकेच राख पसरल्यास किड नियंत्रण होण्यास मदत होते.

८.वीस किलो करंज झाडाची पाने जमिनीवर (नर्सरी बेडवर ) बियाणे पेरण्यापुर्वी मिसळावी. किटकांचा प्रादुर्भाव होत नाही. चांगली वाढ होते. करंज पाने सर्व जमिनीत मिसळल्याने ही अशाच प्रकारे फायदा होतो.

९. कडुलिंब व भेंडी (Thespesia populnea ) झाडाची पाने मातीत मिसळल्यास किडरोगांचा फारसा प्रादुर्भाव होत नाही.

१०. भात बियाणे दुधात भिजवून लावल्यास विषाणूजन्य रोगाची ( Tungro Virus , Stunt Virus ) लागण होण्याची शक्यता कमी होते.

११. बायोगॅसस्लरीतपाणीमिसळावे.यात भात बियाणे १२ तास भिजवावे.यामुळे रोपात किडरोगावर प्रतिकारशक्ती निर्माण होते.

१२. मिसवाक झाडाची पाने बियाणासोबत वापरावी. बियाणांची रूजवण चांगली होते.

१३. गायीचे शेण - गायीचे शेण व पाण्याच्या मिश्रणात १० तास बी ठेवावे. हे बी सावलीत सुकवून पेरावे. यामुळे चांगली रुजवण होते.

१४. कुजलेले लेंडीखत - हे खत व बीयाणे मिसळून एक रात्र गोणपाटात ठेवावे त्यावर वजन ठेवावे यामुळे चांगली रुजवण होते.

१५. मिठाचे द्रावण- १० लिटर पाण्यात ३०० ग्रॅम मीठ विरघळून द्रावण करावे. यात भात बीयाणे टाकावे. तरंगणारे हलके बी काढून टाकावे. राहिलेले जड बी स्वच्छ पाण्याने धुवून सावलीत वाळवावे.

१६. जिवाणू संवर्धक- प्रत्येक १० कि. बियाणांसाठी अझेटोबॅक्टर जिवाणू खत व स्फुरद विरघळणारे जिवाणू २५० ग्रॅम किंचीत ओलसर करून चोळावे व सावलीत अर्धा तास सुकवावे व लगेच पेरणी करावी.

१७. संध्याकाळी पेरणी केल्यास तिव्र उन्हाचा त्रास होत नाही.

१८. काही शेतकऱ्यांच्या मते अमावस्येला बी पेरणी करणे चांगले असते.

(ब ) भातावरील किड रोग नियंत्रणाचे पारंपारीक उपाय (ITK)

१ खोड किडानांगरणी करताना ४० ते ६० किलो कडुलिंब पेंड प्रती एकर मिसळावी किंवा पाण्याच्या प्रवाहात पेंड मिसळावी.

२ खोड किडा ५ किलो लसूणची पेस्ट करावी त्यात २ ते ३ लिटर पाणी चांगले मिसळावे. हे मिश्रण गाळून घ्यावे. ५०० मिली मिश्रणामध्ये १५ लिटर पाणी मिसळून ८ ते १० गुंठे जागेत फवारणी करावी.

३ खोड किडा नालीच्या भाजीची (Ipomoea-aquatica) ३ ते ४ किलो पाने वाटून पेस्ट करून घ्यावी त्यात ४०० मिली ताक व १५ लिटर पाणी चांगले मिसळावे. यातील ३०० मिली मिश्रण पाण्यात मिसळून सुमारे १ गुंठ्यासाठी वापरावे.

४ खोड किडा शतावरीची ३०० ग्रॅम खोडे बारीक करावी व २ लिटर पाण्यात मिसळावी. त्यातील २०० ग्रॅम मिश्रण पाण्यात मिसळून १ एकर शेतात फवारणी करावी. तीन दिवसात चांगले परीणाम दिसून येतात.

५ खोड किडा सिलीकॉन युक्त सेंद्रीय खत द्यावे. उदा. तुस, उसाचे चिपाड, पेंढा, बांबू पाने इ. केरळमधील शेतकरी नारळाच्या झावळ्या वापरतात.

(क्रमशः)



मिस कृषीवलच्या विजेत्या

मिसेस कृषीवलच्या विजेत्या



दैनिक कृषीवलच्या वर्धापनदिनी आयोजित केलेल्या मिस आणि मिसेस कृषीवल या जिल्हास्तरीय सौंदर्यस्पर्धेसाठी क्षात्रैक्य समाज हॉल येथे प्रेक्षकांनी अलोट गर्दी केली होती. या स्पर्धेदरम्यान मंगळागौर, गणेशवंदना आणि पारंपारिक नृत्याचा आस्वाद प्रेक्षकांनी घेतला. सौंदर्यस्पर्धेतील स्पर्धकांनी देखील आपल्या पेहराव्यांनी आणि वक्तृत्व कलेने उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमासाठी कृषीवल सल्लागार संचालक सुप्रिया पाटील, व्यवस्थापकिय संचालक चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई, माजी जि.प. सदस्य द्वारकानाथ नाईक, माजी नगरसेवक प्रदीप नाईक, माजी उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे, वृषाली ठोसर यांच्यासह स्पर्धेचे परीक्षक, उपस्थित मान्यवर आणि स्पर्धेकांचा कृषीवल परिवारातर्फे सन्मान करण्यात आला.





कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)